# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

Vol. - 2
Issue - 4
October 2009
ऑक्टोबर २००९

# संवाद

## दिवाळी विशेषांक

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥



Visit us at : www.sbipensionerspune.org
E-mail : sbipenmumbai@yahoo.com

# संपादकीय

सभासद बंधूंनो,

'संवाद' चा हा दिवाळी अंक आपणास सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. 'संवाद' च्या उच्च परंपरेला साजेल असाच हा अंक असल्यामुळे आपल्या पसंतीस तो उतरेल याविषयी आम्हाला निश्चिती आहे. दिवाळीचा फराळ संपला असला तरी या 'संवाद' मधील साहित्यरूपी फराळ आपणास दीर्घकाळ समाधान देत राहील. आपल्या प्रतिक्रियांची मात्र आम्ही नेहमीप्रमाणे उत्सुकतेने वाट पहात आहोत. दिवाळी नुकतीच संपली असली तरी वर्षातील हा सर्वात महत्त्वाचा व आनंदाचा सण म्हणून त्याचं महत्त्व. प्रकाशाची व तेजाची उधळण करणारा हा सण. दिवाळीच्या प्रकाशाने आपले अवघे जीवन उजळून निघावे, तेजाने आपले जीवन व्यापून जावे अशी आपण मनोमन इच्छा करतो आणि ती शुभेच्छा-संदेश पाठवून एकमेकांपाशी व्यक्त करतो. आपल्या शुभेच्छा आपण शुभेच्छा-पत्रांद्वारे, दूरध्वनीद्वारे किंवा भ्रमणध्वनीद्वारे कळवितो. आजच्या विज्ञान युगातील सुधारणांमुळे 'मोबाईल' आपल्या हाती आला आणि सारे जगच जणू आपल्या मुठीत सामावले गेले. परस्परांशी वार्तालाप, ख्याली-खुशाली, भावनांची देवाण-घेवाण प्रत्यक्ष संभाषणातून किंवा संदेशाद्वारे ( एसएमएस) कळविण्याची केवढी मोठी सोय 'मोबाईल'च्या रूपाने आपल्याला उपलब्ध झाली आहे बरे ! जगातील कुठल्याही कानाकोपऱ्यात असणाऱ्या आपल्या आप्तेष्ट व्यक्तीशी तात्काळ संपर्क साधू शकणारे हे अत्यंत प्रभावी साधन आज आपल्या दैनंदिन जीवनाचे जणू अविभाज्य अंगच बनलेले आहे. 'मनामनांचा मेळ जुळविण्या'च्या आणि परस्परातील सुसंवाद वाढविण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेला आपला 'संवाद' हे देखील आपल्या सहस्त्रावधी सभासद वाचकांशी संवाद साधणारे आपले एक प्रभावी माध्यम-संपर्काचे साधन झालेले आहे. गेल्या काही वर्षांपासून दर महिन्याला न चुकता आपल्या भेटीस येणाऱ्या 'संवाद'ची लोकप्रियतादेखील वाढते आहे. 'संवाद'ची ही लोकप्रियता आपल्या सभासदांच्या संख्येपुरती मर्यादित नाही याचा आम्हाला मध्यंतरी सुखद अनुभव आला. आम्ही आमच्या कामात मग्न असतानाच अचानक आमचा भ्रमणध्वनी वाजू लागला. उत्सुकतेने तो उचलून आम्ही त्या अनोळखी व्यक्तीशी बोलू लागलो. 'संवाद' चा अंक वाचून त्या व्यक्तीने आमच्या लेखासाठी आनंद व समाधान व्यक्त करणारी स्वत:ची प्रतिक्रिया व्यक्त केली. आम्ही ती पत्राद्वारे कळविण्याची विनंती करताच ती अनोळखी व्यक्ती उत्तरली की, मी आपल्या संघटनेचा सभासद नाही, तर 'संवाद'चा फक्त एक वाचक आहे. मी 'पोस्टमन' आहे. 'संवाद' च्या अंकाचे गठ्ठे दर महिन्याला आमच्या टपालकचेरीत आल्यावर मी त्यांचं वाटप करण्यापूर्वी प्रथम तो वाचून काढतो. आपला लेख मला खूप आवडल्यामुळे न राहवून मी माझी प्रामाणिक प्रतिक्रिया आपल्याला कळवली. यावर आम्ही काय बोलणार ? मात्र आपल्या लेखणीचं, लेखनकलेचं सार्थक झाल्याचं अनोखं समाधान आम्हाला मिळालं. आपल्या 'संवाद'च्या लोकप्रियतेची आणखी वेगळी पावती काय हवी? सभासद वाचक बंधूंना या निमित्ताने आपला 'संवाद' यापुढेही अशीच आत्मविश्वासपूर्वक व दमदार वाटचाल करीत राहील याची ग्वाही आम्ही देऊ इच्छितो. सूर्य तोच. पण तोच सूर्य दररोज उगवल्यावर आपल्याला नव्याने तेज प्रदान करीत असतो. पणती तीच. पण तिची छोटीशी ज्योत देखील भोवतालचा अंधार नष्ट करीत आपल्याला मंद प्रकाशाचं दान करीत असते. दिवाळीत घरांघरांपुढे टांगलेले आकाशकंदिल आणि दारांपुढील रांगोळ्या पणतीच्या प्रकाशात उजळून सौंदर्याचा नव्याने साक्षात्कार घडवितात. पुढील वर्षाची दिवाळी येईपर्यंत या दिवाळीतील प्रकाश, तेज व आनंद आपल्या जीवनात भरून राहो आणि सुख-समृद्धीची बरसात करीत राहो हीच आमची त्या जगन्नियंत्यापाशी मनापासून प्रार्थना !

शुभं भवतु !!

– क्रांतिसेन रामचंद्र आठवले

# युनिट वार्ता

**नागपूर झोनल सब्-सेंटर :**

नागपूर झोनल सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.श्रीकांत देसाई यांचा नवीन मोबाईल नंबर 94221 89095 असा आहे. तरी त्यांचेशी असोसिएशनचे कामासाठी संपर्क करावयाचा असल्यास नवीन नंबरवर संपर्क करावा अशी विनंती श्री. देसाई यांनी केली आहे.

**आकोट युनिट -** अकोला जिल्ह्यातील आकोट या तालुक्याच्या ठिकाणी आपल्या स्थानिक सभासदांची पहिली सभा व स्नेहमिलन १३ सप्टेंबर २००९ रोजी आकोट येथील नवयुग वाचनालयात ३३ सदस्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाले. अध्यक्षस्थानी अकोला जिल्ह्याचे सेक्रेटरी श्री.निळकंठ नागराज, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर झोनल सब्-सेंटरचे सेक्रेटरी श्री.जयंत वकील, ज्येष्ठ सभासद श्री.अण्णासाहेब काळे व श्री. डी.जे.पंत हेही व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी सर्व पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांचे हस्ते दीप-प्रज्वलन व गणेश पूजन झाल्यावर श्री.शरद पांडे यांनी पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक केले. श्री.अण्णासाहेब काळे यांनी आपल्या भाषणात पेन्शनर्सनी घ्यायची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले. श्री.वकील यांनी सेवानिवृत्तीनंतर बँकेकडून मिळणारे फायदे व विविध योजनांची माहिती देऊन मार्गदर्शन केले. श्री.शरद पांडे यांनी केंद्र व राज्य सरकार यांच्या ज्येष्ठ नागरिकांना मिळणाऱ्या सवलतींसाठीच्या वयातील तफावत काढून टाकून त्यात समानता असावी यासंबंधी मा.राष्ट्रपती महोदयांकडे पाठविलेल्या निवेदनासंबंधी माहिती दिली. मा.अध्यक्ष श्री.नागराज यांनी आकोट युनिट करत असलेल्या उपक्रमांचे कौतुक करून सर्वांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन श्री.मोहनराव आसरकर यांनी केले. तर श्री.नारायणराव इंगळे यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री शरद पांडे, मोहनराव आसरकर, फोकमारे, वानखडे, मोकासदार व सकळकळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

- शरद पांडे, सचिव (आकोट)

************

**सोलापूर युनिट -**

**श्री साई महिला प्रतिष्ठान आयोजित**
**राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार**

सोलापूर येथील आपल्या बँकेतून, सेवानिवृत्तीनंतर दिवंगत झालेल्या सौ.अलकनंदा जोशी यांचे पती व आपले फॅमिली पेन्शनर सभासद प्रा.अरुण जोशी हे सोलापूर येथील सुप्रसिद्ध 'इंडियन मॉडेल स्कूल' या शैक्षणिक संकुलाचे प्रमुख आहेत. दि.३१ ऑगस्ट २००९ रोजी जोशी सरांनी आपल्या स्वर्गीय पत्निच्या स्मृतीप्रित्यर्थ, राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्काराचे वितरण करण्याचा सोहळा आयोजित केला होता. त्या सोहळ्यात समाजाप्रति असलेल्या बांधिलकीचे भान ठेऊन, समाजऋणातून अंशत: तरी मुक्त होण्याच्या प्रांजळ हेतूने, कितीही दाहक असले तरी खऱ्या अर्थाने संजीवक असलेले व्रत घेतलेल्या या पाच महिलांचा, प्रत्येकी रु.५०००/-, शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला व अशा तऱ्हेचा पुरस्कार दरवर्षी देण्याचे जाहीर केले. हे प्रथम वर्षाचे पुरस्कार, सुप्रसिद्ध अभिनेत्री, लेखिका व कवयित्री असलेल्या डॉ.निशिगंधा वाड यांच्या शुभहस्ते, शैक्षणिक कार्याबद्दल नागपूरच्या प्रा.डॉ.अलका देशमुख, वैद्यकीय सेवेसाठी धुळ्याच्या डॉ.अंजली चितळे, औद्योगिक क्षेत्रातल्या ठाण्याच्या डॉ.सुजाता पवार, बँक सेवेबद्दल महाडच्या श्रीमती शोभा सावंत आणि समाजकार्यासाठी सोलापूरच्या ब्रह्माकुमारी प्रमिलादीदी यांना प्रदान करण्यात आले. सोलापूरच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतिक असलेल्या हुतात्मा स्मृति मंदिरात, समाजातील सर्व स्तरातील प्रेक्षक व स्टेट बँकेतील कर्मचारी व सेवानिवृत्त सभासदांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. या प्रा.अरूण जोशी यांच्या अनुकरणीय उपक्रमास आपल्या असोसिएशनतर्फे मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा !

- तम्मा पाटील,

सेक्रेटरी

********************

(Courtesy - 'State Bank Official', July '09 issue of Bulletine of SBI Officers' Assn,Mumbai Circle)

## १९६९ साली झालेल्या १७ दिवसांच्या बँकेतील अधिकाऱ्यांच्या संपातील वीरांना **मानाचा मुजरा !**

ऑल इंडिया स्टेट बँक ऑफिसर्स फेडरेशनचे २४ वे त्रैवार्षिक सत्र अधिवेशन नुकतेच आग्रा येथे संपन्न झाले. १९६९ साली घडलेल्या स्टेट बँकेतील अधिकाऱ्यांच्या बेमुदत संपाच्या चाळिशीचे औचित्य साधून आपल्या ऑल इंडिया स्टेट बँक ऑफिसर्स फेडरेशनतर्फे श्री.व्ही.एच.खेडगीकर ह्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. ह्या प्रसंगी स्टेट बँक ऑफिसर्स असोसिएशनतर्फे श्री.खेडगीकर ह्यांना दरमहा रु.२०००/- (रु.दोन हजार फक्त) एवढे मानधन तहहयात देण्याचे जाहीर करण्यात आले आणि त्या रकमेचा पहिला चेक त्यांना उपस्थित १००० कॉमरेड बांधवांच्या साक्षीने प्रदान करण्यात आला. संपकाळात तत्कालीन मॅनेजमेंटचे अवाजवी आदेश झुगारून सस्पेंशन सारख्या अनुशासनात्मक कारवाईस न जुमानता संप यशस्वी करण्यात श्री.खेडगीकर ह्यांचा सिंहाचा वाटा होता. संपाच्या यशस्वितेनंतर अनेकविध सुविधा अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या. त्याचीच फळे आज आपण चाखत आहोत. त्याची परतफेड म्हणून फुल ना फुलाची पाकळी ह्या स्वरुपात त्यांना दरमहा मानधन देण्याचा निर्णय आपल्या संघटनेच्या (ऑफिसर्स असोसिएशनच्या) कोअर कमिटीने घेतला आहे. अशा आशयाचा प्रस्ताव कमिटीपुढे आपले ज्येष्ठ नेते श्री.व्ही.डी.देशपांडे, उपाध्यक्ष एस.बी.ओ.ए. (मुंबई सर्कल) व जॉइंट जनरल सेक्रेटरी, ऑल इंडिया स्टेट बँक ऑफिसर्स फेडरेशन ह्यांनी ठेवला होता त्यास सर्व सभासदांनी अनुमोदन दिले. श्री.खेडगीकर आपल्या ऑफिसर्स असोसिएशनचे १९८४ ते १९८७ व १९९० ते १९९५ ह्या काळात जनरल सेक्रेटरी होते. अशा ह्या वीरास संघटनेतर्फे हार्दिक शुभेच्छा !

केशव ठवकर
अध्यक्ष

पंढरीनाथ दिघुळे
जनरल सेक्रेटरी

***************************

श्री.खेडगीकर हे बँकेच्या सेवेतून ३१ मार्च १९९५ रोजी निवृत्त झाले व आपल्या पेन्शनर्स असोसिएशनचे लगेचच सभासद झाले. त्यांना आपल्याही पेन्शनर्स असोसिएशनतर्फे मानाचा मुजरा ! -सेक्रेटरी

---

### अभिनंदनीय

आपले मुंबई येथील ज्येष्ठ सभासद श्री.जयपाल कोठारे यांची नात कु.अपूर्वा नितीन कोठारे, वय १४ वर्षे, सध्या इ.९वीत शिकत असून गेली ५ वर्षे कथ्थक नृत्याचे शास्त्रीय शिक्षण गोपीकृष्ण इन्स्टिट्यूट येथे श्री.राजेंद्र चतुर्वेदी यांचेकडे घेत आहे. अखिल गांधर्व महाविद्यालयाच्या कथ्थक नृत्यशैलीसाठी असलेल्या प्रारंभिक(१) व पूर्व माध्यमिक(३) परीक्षा तिने चांगल्या रितीने उत्तीर्ण केल्या आहेत. त्याच बरोबर संगीत, एकपात्री अभिनय, चित्रकला, हस्तकला, निबंध लेखन, थ्रो-बॉल इत्यादी विविध क्षेत्रातील तिच्या प्राविण्याबद्दल तिला ज्ञातीतील संस्थांमध्ये तसेच आंतरशालेय जिल्हापातळीवर अनेक बक्षिसेही मिळालेली आहेत. या तिच्या विविध क्षेत्रातील यशाबद्दल असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस खूप शुभेच्छा !

– सेक्रेटरी

### स्टेट बँक पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ, ठाणे-मुलुंड

मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २००९ रोजी ठाणे येथील असोसिएशनचे कार्यालयात मंडळातर्फे श्री.सुरेश घोलप यांचे व्याख्यान आयोजित केले होते. श्री.घोलप यांनी आपल्या खास शैलीत श्री.बाळासाहेब देसाई (राजकारणी), सुप्रसिद्ध साहित्यिक श्री.वि,स.खांडेकर व श्री.रणजित देसाई, डॉ.काशिनाथ घाणेकर (अभिनेता), सुप्रसिद्ध शिल्पकार श्री.रघुनाथ फडके, रँग्लर नारळीकर, श्रीमती इरावती कर्वे (विदुषी) व सुप्रसिद्ध उद्योगपति श्री.शंतनुराव किर्लोस्कर अशा महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील दिग्गजांच्या आठवणी सांगून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचा दुसरा भाग सादर व्हावा ही श्रोत्यांनी केलेली मागणी हेच या कार्यक्रमाचे यश म्हणावे लागेल. **मंडळाचा पुढील कार्यक्रम १ डिसेंबर २००९ रोजी होणार आहे. आपल्या सभासदांपैकी कोणास असे वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम सादर करण्याची इच्छा असेल त्यांनी श्री.शरद गडकरी, सेक्रेटरी यांचेशी (०२२-२५४११७६१) या नंबरवर संपर्क करावा ही विनंती. – शरद गडकरी, सचिव**

# सर्व सभासदांसाठी अत्यंत महत्वाचे निवेदन

आपल्या 'संवाद' च्या माध्यमातून तसेच निरनिराळ्या सभांच्या माध्यमातून वेळोवेळी आपल्या संघटनेच्या सर्व स्तरावरील पदाधिकाऱ्यांकडून आपल्या सभासदांना खालील गोष्टींकडे लक्ष देऊन त्याची पूर्तता करण्याविषयी आवाहन केले जात असते. परंतु अजूनही बऱ्याच सभासदांकडून त्याकडे लक्ष गेलेले दिसत नाही असे आमच्या निदर्शनास आले आहे. कारण दुर्दैवाने पेन्शनर दिवंगत झाल्यावर त्याच्या पत्निस फॅमिली पेन्शन मिळण्यास, कागदपत्रांची पूर्तता वेळीच न केल्यामुळे, विलंब लागतो. तसेच पेन्शनर म्युच्युअल फंडाचा मेंबर होता का नाही, असल्यास दरमहा किती युनीटस् ची रक्कम पगारातून कापली जात होती, पेन्शन पेमेंट ऑर्डर (P.P.O.), कुठे ठेवली आहे, फॅमिली पेन्शन मंजूर झालेले आहे की नाही, मेडिकल बेनिफिट स्कीम चा मेंबर असल्यास त्याचे पासबुक कुठे ठेवले आहे इत्यादी माहिती पत्निस वा घरातील इतर कोणास सांगून ठेवलेले आढळत नाही. त्यामुळे फॅमिली पेन्शनरला ही माहिती आपल्या कार्यकर्त्याला सांगता येत नाही. या अडचणींवर मात करण्यासाठी पेन्शनरने आपण हयात असतांनाच खालील माहिती संकलित करून ती एका फाईलमध्ये सर्व अर्जांच्या नमुन्यासह/पासबुकांसह लावून आपल्या पत्निस किंवा मुलगा,मुलगी वा इतर जवळच्या नातेवाईकास दाखवून जपून ठेवणे आवश्यक आहे.यासाठी आपले कोल्हापूर येथील एक सभासद श्री.एस.बी.उमदी यांनी अशी माहिती संकलित करण्यासाठी एक १६ पानी संच तयार केला आहे. त्यात वेगवेगळे अर्जाचे नमुने समाविष्ट केले आहेत. त्यातील महत्वाची माहिती खाली दिली आहे. सभासदांनी ती भरून जवळ ठेवावी.या १६ पानी संचाचे छपाई मूल्य रू.१०/- आहे. अर्थात परगावातील इच्छुकांना पोस्टेज खर्च सोसावा लागेल. ज्या सभासदांना श्री.उमदी यांनी तयार केलेला संच पाहिजे असेल त्यांनी त्यांचेशी पुढील पत्त्यावर संपर्क करावा. श्री.एस.बी.उमदी. एस्.बी.आय. ओंकार हाऊसिंग सोसायटी, फ्लॅट नं.५, सुर्वे कॉलनी, कोल्हापूर-४१६००३: फोन नं.- **०२३१-२६६१८५८**

**- सेक्रेटरी**

1) Name of the Pensioner with full address
2) Provident Fund Index Number
3) Date of Birth of Pensioner
4) Grade / Designation of the Pensioner at the time of retirement
5) Date of Joining the Bank
6) Date of Confirmation
7) Date of Admission to Pension Fund
8) Date of Retirement
9) Age at the time of retirement ___Yrs __Months __days
10) Total qualifying service for pension ___Yrs ___Months ___days
11) Average monthly salary for pension computation
    Pre-revised Salary ___________
    Revised Salary _________
    Last 12 months Basic Salary before retirement (month-wise)
12) Amount of Pension sanctioned by the Bank
13) If pension commuted, Commutation Amount received Rs.___________
    Date of restoration of Pension ________
14) Name of Branch / Office where from Pension retired
15) Name of Pension paying Branch
16) Name of Family Pensioner
17) Amount of Family Pension sanctioned by Bank (with P.P.O.)
18) Whether member of 'Mutual Welfare Scheme' ? If yes, what amount of units (monthly contribution) was being deducted from Salary. If possible, please file copy of Salary slip given by Bank.
19) Terminal Benefits received :
    (a) Provident Fund ; (b) Commutation Amount; (c) Gratuity; (d) Leave encashment; (e) Ex-Gratia Amount (If retired under VRS / Exit)
20) Copies of all sanction letters of above terminal benefits alongwith calculation sheets
21) Bank Pass-Book; SBI Retired Emp.Medical Benefit Scheme Pass-Book

**- Secretary**

# आवाहन

सर्व सभासदांसाठी -

आपणास माहित आहेच की जे पेन्शनर्स १ नोव्हेंबर २००२ नंतर निवृत्त झाले आहेत त्यापैकी ज्यांचा बेसिक पे रु.२१,०४०/- पेक्षा जास्त होता व ज्यांना e-Circular No.CDO/P&HRD-PM/8/2008-2009 dt.3-05-2008 प्रमाणे Half of FPP/PQA धरून १-०५-२००५ पासूनचे ॲरिअर्स देण्याचे काम जवळजवळ पूर्ण झालेले आहे. तसेच फॅमिली पेन्शनर्सनासुद्धा e-Circular No.CDO/P&HRD-PM/62/2007-2008 dt.28-01-2008 प्रमाणे १-०५-२००५ पासूनचे ॲरिअर्स देण्याचे काम पूर्ण झालेले आहे. तरी ज्या Eligible पेन्शनर्सना व फॅमिली पेन्शनर्सना वरील सर्क्युलर्सप्रमाणे ॲरिअर्स मिळाले असतील त्यांना आवाहन आहे की पेन्शनर्सनी ॲरिअर्स रकमेच्या १०% व फॅमिली पेन्शनर्सनी ॲरिअर्स रकमेच्या ५% प्रमाणे असोसिएशनला देणगी द्यावी ही विनंती. ही देणगी आपापल्या झोनल सब्‌सेंटरकडे पाठवावी. रक्कम असोसिएशनचे नांवे चेकने पाठवावी व त्या सोबतच्या पत्रात तसा उल्लेख करावा. तसेच ही रक्कम Corpus Fund ला जमा करावी असा स्पष्ट उल्लेख करावा ही विनंती. तसेच ही पत्रे सब्‌सेंटर्सनी त्यांचेकडेच फाईल करून ठेवावीत. तरी अशा ॲरिअर्स मिळालेल्या सर्व पेन्शनर्स/फॅमिली पेन्शनर्सना आवाहन की त्यांनी देणग्या लवकरात लवकर पाठवाव्यात ही विनंती.

- सेक्रेटरी

# An Appeal to
## All Pensioners/Family Pensioners

As you know that the Pensioners who retired after 1-11-2002 and as per Bank's e-Circular No.CDO/P&HRD-PM/8/2008-2009 dt.3-05-2008 who are eligible to receive revised pension after taking into account half of FPP/PQA as per revised formula have now received arrears after 1-05-2005. Similarly the Family Pensioners who were eligible to receive revised family pension vide e-Circular No.CDO/P&HR-PM/62/2007-2008 dt.28-01-2008 have been paid arrears by the Bank. The work of payment of arrears to eligible Pensioners/Family Pensioners has almost been completed.

It is, therefore, appealed to such Pensioners/FamilyPensioner members, who have received arrears, to pay Donations to the Association as under.

**Pensioners 10%**
**Family Pensioners 5%**

The Donation cheques should been drawn favouring Association and should been sent to respective Zonal Sub-Centres along with a covering letter indicating therein that the amount should be treated as 'CORPUS' fund. These letters should be preserved by the Zonal Sub-Centres in a separate file. All the Pensioners/Family Pensioners are appealed to donate as indicated above.

**- Secretary**

### पाणीच पाणी

उमेदवार : तुम्ही मला प्रचंड मतांनी निवडून द्या ! मी तुमच्या सर्व समस्यास व अडचणी दूर करेन.

मतदार : आमच्या भागात नेहमी पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ असतो, त्यासाठी फार वणवण होते.

उमेदवार : घाबरू नका. आता आपल्या शास्त्रज्ञांनी नुकताच चंद्रावर भरपूर पिण्याचे पाणी आहे असा शोध लावला आहे. ते पाणी नळाने तुमच्या गावात आणण्याचे मी आश्वासन देतो.

**- वसंत धुपकर**, पुणे

### चारोळी

माझ्यातला 'मी' आणि तुझ्यातला 'तू'
कोणी ओळखायचा प्रयत्नच करीत नाही
अन्यथा कुठल्याच क्षणी 'तूतू' 'मैमै'
होण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही

*****

विचारांच्या ओंजळीतून पाणी पिताना
ज्ञानाची तहान वाढत जाते
मग कक्षा रुंदावतात विचारांच्या
आणि ज्ञानाची उंचीही वाढत जाते

**- शरद महाबळ,**

## Fitness of the Elderly - Walking : One of the Best Exercises

It is said that a brisk walk will do more good than all the medicines and psychology in the world. A normal human being has two doctors at his disposal, the left leg and the right. Walking can be done almost anywhere, at any time and it requires no special equipment except a pair of good shoes. Walking helps in maintaining a healthy life, till very old age. Some of the benefits of walking/ fitness exercises are given below, including precautions to be exercised.

1. Walking helps circulation of blood throughout the body, which will have beneficial effect on the health. While walking, there is pressure at the ends of the veins in your legs to push the blood back to the heart. As the muscles of the legs move, they compress the nearby veins. This forces the blood back to the heart and gives a feeling of well-being. That is why leg muscles are called the secondary pump, their pumping action is considered second only to the heart.

2. There are more than 400 muscles in the body, which are responsible for movement of the joints, keeping right posture, support of the body weight, circulation of blood, respiratory and elimination. A good exercise work- out should contract and stretch all these muscles. This cannot be done in 5 or 10 minutes. Minimum time for an adequate work-out is 20 minutes.

3. One spends the same body energy whether one runs or walks since body weight is the same which is carried through an equal distance. Speed of the movement of body does not matter. However, if one runs for 20 minutes, one will cover more distance than if he walks for 20 minutes, and will burn more calories.

4. Muscles which are not exercised deteriorate in strength rather rapidly... If a person is immobile for 3 days, his muscle strength is reduced by 20%. Immobility adversely affects circulatory, respiratory, digestive and nervous systems of the body. After 2 or 3 days, do exercise of the muscles in order to achieve physical fitness at a desirable level. NASA scientists have found that exercise during 3 days in a week, not consecutively, will help maintain fitness, though daily exercise is more beneficial.

5. If breathing rate does not come down to normalcy within 5 minutes of exercise, it means you have exerted too much, which should be avoided. Over-exercise will make sleep difficult and produce tiredness/ cramps in muscles, which may last till next day or more.

6. Stretching exercises should be done slowly, allowing the muscles to relax. Vigorous stretching makes muscles tight, not flexible. A sensor system in each muscle automatically reacts to a sudden stretch; it is a form of protection against over-stretching. While doing stretching exercise (for example - bending at the waist, touching your feet), move slowly. If some tension is felt, hold that position for a few seconds, then relax.

7. Exercise of any part of the body burns fat from all over the body and not from a particular area. It is not possible to bring down amount of fat in a specific part without bringing down fat in other parts of the body. However, low fat nutritious diet and proper exercise help in reducing fats in the body which will include fats in the abdomen area.

8. Sweating brings down body temperature; it does not result in loss of body fat. One may weigh less after exercise, but it is due to loss of water in the body. Drink water or other liquids, you will regain weight.

9. It is far better to walk at a slower pace, but for a longer distance. Moreover, recovery from injuries, minor/major ailments is faster due to moderate walking, as doctors often insist on it.

In sum, walking is one of the most beneficial exercises for the elderly to maintain healthy living till very old age. Walking should be done according to one's own stamina. It is agreed by fitness experts that a walk for 20 minutes a day, 4 to 5 times a week, will help body to remain healthy and to ward off ailments, which will otherwise attack an inactive body. Therefore, walking is a panacea for almost all ills for most people, especially the elderly.

Wish you enjoyable walking throughout your lives.

Ramesh Kaul, Mumbai,(M) 9892778518

(Source: This article has drawn upon information contained in a booklet titled "How to Keep Fit- for Life - Reader's Digest Publication,2002 for humanitarian purpose for better health of the elderly pensioners of SBI, and is strictly for non-commercial use.)

# दिवाळी शुभेच्छा

**TOURWAYS** मुंबई यांच्या विविध सहली

- अंबाजोगाई दर्शन यात्रा
- साडेतीन शक्तिपीठ यात्रा
- आदि शंकराचार्य स्थापित चारधाम यात्रा
- कोस्टल कर्नाटकातील अष्टविनायक दर्शन
- कोस्टल कर्नाटक

  Sea shores _ mountains _waterfalls _mandirs all in one tour
- (कुर्ग) मेंगलोर ते मडिकेरी
- लक्षद्विप

सर्व सहलींचे माहिती पत्रक उपलब्ध

सहल खर्चात निरनिराळया सवलती

स्टेट बँकेच्या पेन्शनर्सना खास सवलतः

सर्व सहलींना उत्कृष्ठ हॉटेलातील आपल्या पसंतीचे जेवण

सहलीच्या काळात आपला वाढदिवस येत असल्यास सहल खर्चात पुरुषांना ३०% तर महिलांना ५०%सहल खर्चात सवलत देण्यात येईल

सर्व सहलींच्या तारखा करीता संपर्क 90290 90690

92232 73496

022-65 281 281

अनोळखी जगाची ओळख

**TOURWAYS**

C – 305 – PALM ACRES, M.PHULE ROAD, MULUND (E) MUMBAI 400 081

# मंतरलेले दिवस

काही काही आठवणी अशा असतात की त्या वर्षानुवर्षे आपल्या मनात ताज्या असतात व हृदयाच्या कप्प्यात कायम घर करून बसतात. १९७३ साली सांगली शाखेत असताना अचानक एके दिवशी मला आपल्या देवगड शाखेला डेप्युटेशनवर १५ दिवसांसाठी पाठवण्याचा निर्णय झाला. मला लहानपणापासूनच निसर्गसौंदर्याची आवड व कोकण हा प्रदेश निसर्गसौंदर्याची खाणच असल्यामुळे मला अर्थात देवगडला जाण्याचा खूप आनंद झाला.

सप्टेंबरच्या मध्यास मी देवगडला गेलो. गणपतीचा उत्सव नुकताच संपून गेला होता. आपली शाखा गावाबाहेर अर्धा पाऊण किलोमीटर अंतरावर कोल्हापूर रस्त्यावर होती. बँकेतसुद्धा मला दोन तीन चांगले मित्र मिळाले.

देवगडच्या पश्चिमेला अरबी समुद्राचे निळे पाणी अथांग पसरलेले दिसे. डॉ.मराठे यांच्या बंगल्यात माडीवर दोन खोल्या मला रहायला मिळाल्या होत्या. पश्चिमाभिमुख खिडक्या असल्याने समुद्राचे दृश्य अगदी विहंगम दिसत असे.

दिनक्रम अगदी ठरलेला असायचा. कॅशला असल्यामुळे तसेच त्यावेळी एकूणच त्या शाखेला कामाचा फार ताण नसल्याने संध्याकाळी ५/५॥ ला बँकेतून बाहेर पडायला मिळे. त्यानंतर समुद्रावर भटकंती करायची. कधी एखादे दिवशी आणखी लवकर काम आटपले तर ३ किलोमीटरवर असलेल्या श्रीकुणकेश्वर देवस्थानला जाऊन यायचे. रात्री ८/८॥ ला श्री.गोडबोलेंच्या भारत भोजनालयात जेवण करून ९ वाजता तेथील युनियन बँकेच्या शाखेत कॅरम खेळायला जात असे. त्या बँकेचे शाखाधिकारी श्री.सबनीस यांना माझ्याप्रमाणेच कॅरम खेळण्याचा चांगलाच शौक होता. त्यामुळे आमची दोघांची चांगलीच गट्टी जमली होती. तेथून रात्री ११/११॥ ला परत आलो की थोडेसे वाचन करत असे. रात्री १२ नंतर माझा आवडता छंद म्हणजे 'कोकणसेवक' बोट पहात बसणे. साधारण रात्री बाराच्या सुमारास दूरवरून ती बोट समुद्रातून येताना त्यावरील विद्युतप्रकाश दिसे. दृश्य अतिशय नयनमनोहर असे. अंधाऱ्या रात्री एखादा तारकापुंज दिसावा त्यासारखे त्या बोटीवरील दिवे चमकत. ती बोट देवगड बंदरात येऊन काही वेळ थांबून नंतर मुंबईकडे मार्गस्थ होई. बोट समुद्रात दिसेनाशी होईपर्यंत मी जागा रहात असे. नव्हे, तो मला रोजचाच छंद जडलेला होता.

मला त्या शाखेला १५ दिवसांसाठी पाठविण्यात आले होते. पण प्रत्यक्षात मला तेथे जवळजवळ २॥-३ महिने रहावे लागले.

आमच्या शाखेत आजूबाजूच्या छोट्या गावातील कोळी लोकांना मासेमारीसाठी छोटी कर्जे वितरण केली होती. त्यासाठी त्यातील बरेच लोक शाखेत येत. कुतूहल म्हणून त्यातील काही लोकांची मी त्यांच्या व्यवसायांविषयी, मासेमारीसंबंधी, तसेच ते मासेमारी करण्यासाठी किती खोलवर समुद्रात जातात याविषयी चौकशी करताना का कोण जाणे त्यांनाही माझेविषयी आपुलकी वाटून त्यांनी मला आपल्या होडीतून सफर करण्याचे आमंत्रण दिले. माझ्यादृष्टीने ही चालून आलेली संधी होती. मी लगेच होकार दिला व रविवारी सुटीच्या दिवशी मी त्यांचेकडे जाऊन तोही रोमहर्षक अनुभव घेतला. मला त्यांनी आपल्या पडावातून जवळ जवळ १॥-२ किलोमीटर आत नेले. बरोबर ४-५ लोक होते. समुद्राच्या मोठ्या लाटांमुळे तो पडाव ४-५ फूट लाटांबरोबर हेलकावे खात होता. खरे तर मी अतिशय घाबरलो होतो. आपण जिवंत परत जातो की नाही असे वाटायला लागले. तथापि त्या सर्व लोकांनी मला धीर दिला व साधारण २ तासांनी सुखरूप परत आणले. आयुष्यात पहिल्यांदाच समुद्र पर्यटनाचा आनंद अनुभवला.

देवगडची माझ्या मुक्कामातील शेवटची आठवण अशी आहे की ती वाचकांना कथन केल्याशिवाय मला राहवत नाही. मी वर्णन केल्याप्रमाणे शाखेत मला काही चांगले  मित्र मिळाले होते. एक दिवस माझे मित्र श्री.प्रकाश सांगोडकर ११-१२ वाजता माझेकडे आले व म्हणाले, ''जोश्या, आज रात्री आम्ही ३-४ जण छोटी होडी घेऊन खाडीत फिरणार आहोत तुला असल्या गोष्टींची आवड असल्यामुळे तू नाही म्हणणार नाहीस अशी खात्री आहे.'' मी लगेच होकार दिला. आमच्या शाखेत एक शिपाई होता. त्याची ४-५ जण बसतील अशी छोटी होडी होती. ती घेऊन आम्ही जाणार होतो. ती कोजागिरी पौर्णिमेची रात्र होती.

देवगडला उत्तरेकडील बाजूने समुद्र आत घुसून खाडी तयार झाली आहे. ती खाडी म्हणजे जणू एखादा मोठा तलाव असावा अशी आहे. सभोवताली नारळी पोफळीची गर्द झाडी आहे.

नुकताच पावसाळा संपत आल्यामुळे सगळीकडे बालकवींच्या ती 'फुलराणी'मध्ये वर्णन केल्याप्रमाणे 'हिरवे हिरवे लाल गालीचे , हरित तृणांच्या मखमलीचे' सर्वत्र पसरलेले होते. प्रसन्न वातावरण होते. जणू काही सृष्टीने शालू पांघरला आहे असे वाटत होते.

आम्ही साधारण साडेनऊच्या सुमारास ती होडी घेऊन खाडीत गेलो. फार दूर नाही. परंतु साधारणपणे १-१॥ फर्लांग आत गेलो. पीठ्ठ चांदणे पडले होते. सभोवताली शीतल शांतता होती. खाडीमधील लाटांचा बारीकसा आवाज येत होता. त्याच्याच जोडीला सर्व दूर पसरलेल्या नारळी पोफळीच्या पानांची सळसळ ऐकू येत होती आणि मधूनच एखादी टिटवी ओरडून जणू शांततेचा भंग करत होती. एकूणच ते दृष्य अतिशय विलोभनीय होते.

आमच्यापैकी एकाजवळ ट्रॉझिस्टर होता. साधारण सव्वा दहाचा सुमार होता आणि सहज त्या मित्राने ट्रांझिस्टरचे बटण फिरविले आणि सांगली केंद्र लावले आणि काय आश्चर्य ! आपली आवड कार्यक्रम चालू होता आणि निवेदन संपून श्रीमती बकुल पंडीत यांनी गायिलेले, 'उगवला चंद्र पुनवेचा' हे नाट्यगीत चालू होते. ते संपूच नये असे वाटत होते. ती आठवण माझ्या मनात इतकी खोलवर कोरलेली आहे की जेव्हा केव्हा मी हे गीत ऐकतो तेव्हा तो प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा राहतो. खरोखरी देवगडच्या मुक्कामातले माझे दिवस म्हणजे खरोखरच मंतरलेले दिवस होते.

**- गजानन जोशी,** संभाजीनगर, कोल्हापूर
दूरध्वनी - ०२३१-२६२३६१२

लघुकथा

## सोबती

अण्णा संध्याकाळचा त्यांचा नेहमीचा फिरण्याचा मार्ग सोडून प्रभात रोडच्या दिशेने चालू लागले.

अण्णा एकटेच होते. वडील लहानपणीच वारले. जवळजवळ ठरत आलेले लग्न ऐनवेळी वधुकडील मंडळीचा नकार आल्याने मोडले. या धक्क्याने त्यांची आई त्यांना सोडून गेली. तेव्हापासून त्यांनी लग्न न करण्याचे ठरवले. पुण्यातील शनिवार पेठेत त्यांची तीन खोल्यांची जागा होती.

पहाटे पाच वाजतो उठणे, सर्व गोष्टी आवरून पर्वतीवर फिरायला जाणे, घरी आल्यावर वर्तमानपत्रावरील ठळक बातम्यांवर एक नजर टाकणे, त्यानंतर आंघोळ, देवपूजा आणि स्वयंपाक. भोजनानंतर एक-दीड तास विश्रांतीवजा झोप. नंतर वर्तमानपत्र अगदी छोट्या जाहिरातीपासून अग्रलेखापर्यंत संपूर्ण वाचणे, संध्याकाळी पुन्हा बाहेर फेरफटका मारणे, रात्री जेवणानंतर जमा केलेल्या पुस्तकांतील थोडे वाचन, एकूण त्यांची दिनचर्या ही अशी.

आज प्रभात रोडकडे अण्णांचे पाय वळायला कारणही तसेच होते. वर्तमानपत्रातील 'सोबती पाहिजे' ही छोटी जाहिरात वाचनात आल्यावर त्यांनी लगेच ठरवून टाकले होते, आज संध्याकाळी प्रभात रोडकडे फेरफटका.

जाहिरातीतील पत्त्याप्रमाणे अण्णा प्रभात रोडवरील चौथ्या गल्लीत आले. उजवीकडील चार-पाच बंगले सोडून ते हव्या त्या बंगल्यासमोर आले. बंगल्याचे नाव बरोबर होते 'सोबती'. दाराजवळ ते पाच मिनिटे थांबले. कुत्रा वगैरे नाहीना, याचा अंदाज घेतला. हळूच फाटक उघडले. आतून कडी लावली. समोरची खोली बंदच होती. खोलीला लागूनच एक जिना होता. बंगला छोटासाच पण टुमदार होता. जिना चढून ते वर गेले. दारावरली बेल दाबली. एकदा, दोनदा. आतून काहीच प्रतिसाद नाही. शेवटचा प्रयत्न म्हणून त्यांनी तिसऱ्यांदा बेल दाबली. तरीही प्रतिसाद नाही. ते जिना उतरू लागले. तेवढ्यात दार उघडल्याचा आवाज त्यांनी ऐकला. ते परत वर गेले. दारात एक गृहस्थ उभे होते. साधारण अण्णांच्याच वयाचे बासष्ट-त्रेसष्ट वयाचे.

'या ना, आत या. कोण पाहिजे ?'

'मनोहर भडकमकर - त्यांना भेटायचे होते.'

'हो ! मीच भडकमकर - या बसा.'

'वर्तमानपत्रातील आपली जाहिरात वाचली नि आलो.'

'पत्ता बरोबर सापडला ना ? उगीच विचारपूस नाही ना करायला लागली ?'

'नाही अगदी व्यवस्थित आलो.'

'मीच दिली होती जाहिरात. अहो बेल ऐकली. पण मी अगदी आतल्या खोलीत होतो. त्यामुळे वेळ लागला दार उघडायला जरा. आपला काही गैरसमज नाही ना झाला ?

'छे हो ! गैरसमज कसला ? उद्या पुन्हा यायचं ठरवूनच परत निघालो होतो. तेवढ्यात दार उघडल्याचा आवाज ऐकला आणि जिन्यातून परत फिरलो.

बसल्या बसल्या त्यांनी खोलीचे निरीक्षण केले. त्यातील टापटीप, नीटनेटकेपणा, तसेच फर्निचर, भिंतींचा रंग, खिडक्यांचे पडदे, त्यातील रंगसंगती, यातील एक वेगळीच कलात्मकता त्यांना जाणवली. क्षणभर ते बघतच राहिले.

'आपण माझी जाहिरात नीट वाचलीत ना ?' भडकमकरांच्या या प्रश्नाने त्यांची तंद्री भंग पावली

'हो अगदी व्यवस्थित वाचली. आपणास सोबती पाहिजे म्हणजे नेमके त्याचे काय काम राहील ?'

'ते सर्व सांगणार आहेच. पण त्या अगोदर आपली माहिती, ओळख वगैरे.'

'मी अविनाश मनोहर देशपांडे. कंट्रोलर ऑफ डिफेन्स खात्यात होतो. तीन वर्षांपूर्वीच रिटायर्ड झालो. शनवार पेठेत राहतो. पेन्शन आहे. एकट्याला पुरेसे आहे.'

'एकटा म्हणजे ? आपल्याला मुले वगैरे ?'

'नाही मी एकटाच आहे. लग्न वगैरे नाही केलं.'

'कमाल आहे बुवा तुमची. एकाकी जीवन कसे जगता ? लग्न न करण्याचे काही कारण ?'

अण्णांना भूतकाळ आठवला. त्यावेळची कॉलेजमधील ती मैत्रीण-सुमित्रा. हो ! सुमित्राच. दिसायला चारचौघींसारखीच. नाक डोळे नीटस. सावळी पण तरतरीत. अभ्यासात हुषार तितकीच विनम्र. नोटस् देण्याघेण्यावरून मैत्री वाढली. दोघेही ग्रॅज्युएट झालो. कॉलेजमध्येच तिला एकदा विचारले होते.

'सुमित्रा, भावी आयुष्यात तू माझी जोडीदारीण होशील ?'

'बघू- ग्रॅज्युएट हो, चांगली नोकरी मिळू दे. मग विचार करीन. मधून मधून भेटूच.'

''सुमित्रा, बरी भेटलीस. तुला एक आनंदाची बातमी सांगायची आहे. मला सरकारी नोकरी मिळाली. लेखी परीक्षा आणि मुलाखत यात नंबर लागला माझा.''

''अरे ही आनंदाची बातमी नुसतीच सांगतोस ? पेढे वगैरे काही देशील की नाही ?''

''अगं ते देईनच ! तुझ्या वडिलांना आता लग्नाचे विचार.''

''अरे मागे एकदा धाडस करून तुझ्याविषयी वडिलांना सांगितले होते. बघू म्हणाले होते. आता तुला चांगली नोकरी मिळाली. काढते विषय लग्नाचा आता वडिलांकडे.''

''सुमित्रा, काढलास विषय लग्नाचा वडिलांकडे ? काय म्हणाले?'' लगेचच झालेल्या पुढल्या भेटीत त्याने विचारले.

''सुमित्रा, तुला मुलगा पसंत आहे ना ? घरची मंडळी वगैरे.'' मी सांगितले, ''अविनाश चांगला मुलगा आहे. सरकारी नोकरी आहे. तुला घरी बोलावले आहे - उद्याच ये.''

''या, या, अविनाश'' - सुमित्राच्या वडिलांकडून स्वागत. ''सुमित्रा, अगं यांना फराळाचे काही आण. नंतर चहा, कॉफी. पहिल्यांदाच आपल्याकडे येताहेत. सुमित्राने तुमच्याविषयी सर्व सांगितले आहे. पत्रिका बघून ठरवू.''

पत्रिका जमली होती. रीतसर मुलगी बघण्याचा कार्यक्रम झाला, पसंती झाली - कळवली. साखरपुड्याची तारीख ठरली. पण ? त्या प्रसंगाची नुसती आठवण झाली तरी..

अण्णांनी भूतकाळातील आठवणींची अक्षरे मनाच्या फळ्यावरून पुसून काढली. फळा साफ केला.

''तसं काही नाही, भडकमकर ! लग्न केलं नाही, एवढंच !''

''आपल्याला नसतं बुवा असं जमलं !'' भडकमकर.

''मी रेल्वेखात्यातून स्टेशनमास्तर या हुद्यावरून दोन वर्षापूर्वीच रिटायर्ड झालो. मला दोन मुलगे. बदलीनिमित्त बराच हिंडलो. पुणे आवडले म्हणून येथेच स्थायिक झालो. दोघेही मुलगे अमेरिकेत असतात. इकडे त्यांना चैन पडत नाही. पाखरांप्रमाणे उडून गेली. आपल्या स्वार्थासाठी त्यांना येथे ठेवून त्यांची प्रगती कशाला रोखायची? वाटलं त्यांना तर येतील, भेटतील किंवा नाही. मी काही मनाला लावून घेत नाही. माणसानं कसं मानसिकदृष्ट्या प्रसन्न असावं, शारीरिकदृष्ट्या निरोगी असावं, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असावं आणि सामाजिकदृष्ट्या सहिष्णू असावं, यातच खरा आनंद आहे आणि यातच जीवनाचे सारे सार आहे.''

''सौभाग्यवती नुकतीच दीड महिन्यापूर्वी निधन पावली. एका जीवघेण्या आजाराने तिला घेरले. खूप खर्च केला. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण गुण आला नाही. आयुष्यात दुखणे तिने पाहिले नाही आणि आले ते शेवटचेच. खूप वाईट वाटलं मला. आयुष्याच्या खेळात आपण कितीही जपून पाने टाकली तरी परमेश्वराची पाने कळत नाहीत आपल्याला. त्याच्याकडून कधी, कसे वरचढ पान पडेल आणि आपण डाव हरू याची पुसटशी कल्पनाही आपणांस येत नाही. मोठी प्रेमळ आणि लाघवी होती ती. सतत जमवून घेणारी, हसतमुख आणि आनंदी. म्हणायची इतकी वर्षे मी तुमची साथ केली, तुमच्या आनंदात, दु:खात वाटेकरी झाले. तुमच्या हट्टी स्वभावाबद्दल कधीच नाराजी, खंत केली नाही. सदैव तुमच्या पाठीशी उभी राहिले. आता जीवनाच्या शर्यतीत मी मात्र पुढे जाणार. शेवटी तिचे म्हणणे तिने खरे केले. मुलांची आणि तिची शेवटी भेटसुद्धा झाली नाही. शेवटी सर्व विसरून आयुष्याची पुढील वाटचाल सुरू केली. सवडीने दाखवीन मी तिचा फोटो.'

''बरं मग मी इथं काय करायचं ?'' अण्णांचा मध्येच प्रश्न.

''तुम्हाला येथे माझ्याबरोबर रहायला जमेल का ?''

अण्णा क्षणभर विचारात पडले. त्यांचे एक मन सांगत होते, अरे ते तुझे घर, पुस्तकांचा संग्रह, फर्निचर, भांडी या सर्व अचेतन वस्तूंशी इतक्या वर्षांच्या सहवासाने एक अतूट नातं निर्माण झालंय आणि आता तू त्यांची सोबत सोडणार ? दुसरं मन सांगत होतं, अरे! आज एका माणसाला माणुसकीच्या सोबतीची गरज आहे. वेळ मिळेल तसा घरी जाऊ शकतील. त्या सर्व अचेतन वस्तूंशी संवाद साधू शकशील. हो म्हणून टाक.

''मग ठरलं ना ?'' मनोहरपंतांच्या या प्रश्नाने अण्णा विचारचक्रातून बाहेर पडले.

''हो ठरलं.'' अण्णांनी निश्चयपूर्वक सांगितलं.

''तर मग तुम्ही माझ्याबरोबर इथं रहायचं. दोघांनी पहाटे फिरायला जायचं. जसा जमेल तसा दोघांनी स्वयंपाक करायचा.''

''मला हिने थोडा फार स्वयंपाक करायला शिकवले आहे. नोकरीवर कधी कधी एकटा असताना त्याचा चांगला उपयोग होत असे. जेवणानंतर वर्तमानपत्र वाचणे. त्यावर चर्चा, गप्पागोष्टी, दुपारी थोडी विश्रांतीवजा झोप. संध्याकाळी बाहेर एक फेरफटका. जमलं तर परिसंवाद, भाषणे, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रमांना हजेरी लावणे-जेवणे-झोप असा आपला सर्वसाधारण कार्यक्रम राहील. थोडक्यात अशा प्रकारे मला तुमची सोबत राहील. लहानपणी आईवडलांची, नंतर मित्रांची, लग्न झाल्यावर पत्नीची, नंतर मुलांची, सुनांची, नातवंडांची सोबत असते. आज यातलं माझ्याजवळ काहीच नाही. म्हणून वर्तमानपत्रात 'सोबती पाहिजे' अशी जाहिरात दिली.''

''मोबदल्याचं नाही विचारलंत ?''

''अहो, त्याचे काय ? नंतर बघू.''

थोड्या दिवसांच्या सहवासानंतर अण्णांचे आणि मनोहरपंतांचे चांगलेच सूर जमले. अण्णांसारखा चांगला 'सोबती' लाभल्यामुळे मनोहरपंत मनातून अत्यंत खूष होते. अण्णा सवड मिळेल तशी शनिवार पेठेत आपल्या घरी भेट देत असत, साफसफाई करत असत.

एके दिवशी रात्री जेवणानंतर दोघांच्या गप्पा चांगल्याच रंगल्या होत्या. गप्पांच्या ओघातच मनोहरपंत म्हणाले,

''अण्णा मागे मी तुम्हाला म्हणालो होतो ना, की सौभाग्यवतीचा फोटो एकदा दाखवीन म्हणून.''

मनोहरपंत उठले. त्यांनी कपाटातील एक फोटोचा अल्बम काढला. म्हणाले, 'यात खूप जुने फोटो, माझ्या आई-वडिलांचे-आजोबांचे तसेच आमच्या लग्नाचेसुद्धा. अगदी जपून ठेवले आहेत. अधूनमधून हा अल्बम काढून फोटो बघत असतो. जुन्या आठवणीत रमून जातो.''

''ही माझी सौभाग्यवती. सुमित्रा. नाव चांगलं म्हणून तेच ठेवलं. लग्नात बदललं नाही.' एका फोटोकडे बोट दाखवत मनोहरपंत म्हणाले, 'पुण्यातीलच. ॲडव्होकेट अत्रे यांची मुलगी मला सांगून आलेली पहिलीच मुलगी - पसंती आणि लग्न.'

अण्णांनी फोटोवरून नजर फिरवली. एकदा, दोनदा, तीनदा आणि जुन्या आठवणींनी त्यांच्या भोवती केव्हा फेर धरला त्याचं

त्यांनाच कळलं नाही.

'हो ! हीच सुमित्रा. आपली जुनी कॉलेज मैत्रीण. हिच्याशीच आपला साखरपुडा निश्चित झाला होता आणि अचानक एक दिवस सुमित्राने वडील घरी आले.

'मला माफ करा अविनाश. आपली दोन्ही घराणी एकत्र येण्याचा योग नाही. आपण आमच्यावर अवलंबून राहू नका.' इतकंच सांगून निघून गेले. कारण काहीच कळलं नाही.

त्यानंतरही आपण तिच्या वडिलांना भेटलो. ते आपल्या निर्णयावर ठाम होते.

का नकार दिला असेल त्यांनी ? आपली साधी सरकारी नोकरी होती म्हणून ? का हे मध्येच भडकमकरांचे श्रीमंत स्थळ भेटले म्हणून ? आणि या गोष्टीला सुमित्रा कशी तयार झाली ? का तयार नसताना तिच्यावर हा निर्णय लादला गेला ? भेटीतल्या बोलण्यावरून श्रीमंत घराचा तिचा अट्टाहास नव्हता. माणसे चांगली असावीत एवढीच तिची माफक अपेक्षा होती. मग नियतीने असा डाव का टाकला ? आयुष्यात जिची आपल्याला सोबत हवी होती ती सोबत आपल्याला लाभलीच नाही आणि आता तिच्या पश्चात तिच्या पतीला आपण आयुष्यभर सोबत करायची ? त्यांची काळजी घ्यायची ? का आपण आपला निर्णय बदलू नये ? तिने नाही का आपला निर्णय फिरवला ?

अचानक अंगावर आलेल्या अविचाराच्या पालीला त्यांनी अंगावरून झटकले.

आयुष्याच्या खेळात आपण कितीही जपून पाने टाकली तरी परमेश्वराची पाने कळत नाहीत आपल्याला. त्याच्याकडून कसे, कधी वरचढ पान पडेल आणि आपण डाव हरू, याची पुसटशी कल्पनाही आपणास येत नाही. मनोहरपंतांचे शब्द त्यांना आठवले. खरे आहे. नियतीचा खेळच वेगळा.

'कसा आहे सुमित्राचा फोटो ?' मनोहरपंतांच्या या प्रश्नाने अण्णा विचारांच्या वावटळीतून बाहेर पडडे.

'अं ! छान आहे. फोटोग्राफरने आपले सारे कौशल्य पणाला लावले आहे.'

'अहो ! ती होतीच तशी. तिचा फोटो बघितल्याशिवाय मी झोपत नाही. सोबतीला बोलावते आहे असा सारखा भास होतो तिचा फोटो पाहिल्यावर.'

'खरोखर नशिबवान आहात तुम्ही मनोहरपंत. चला झोपा आता - गप्पा फार झाल्या. सकाळी लवकर उठायचं आहे उद्या.'

नेहमीप्रमाणे आण्णा सकाळी लवकर उठले. सवयीप्रमाणे त्यांनी मनोहरपंतांना हाक दिली. नेहमी पहिल्याच हाकेला साद देणारे, आज त्यांची साद आली नाही. अण्णांनी पुन्हा हाक दिली. प्रतिसाद नाही. अण्णा त्यांच्या खोलीत गेले. मनोहरपंत निपचित पडले होते. काहीच हालचाल दिसत नव्हती. काल दाखवलेला फोटोचा अल्बम तसाच एका हातात होता. क्षणभर अण्णांना काही सुचेना. त्यांनी त्यांचे पांघरूण सारखे केले. त्यांच्या फॅमिली डॉक्टरांना फोन करून बोलावून घेतले.

डॉक्टरांनी मनोहरपंतांना नीट तपासले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अण्णा थोडे भांबावले पण त्यांनी स्वत:ला सावरले. अमेरिकेतील त्यांच्या मुलांना फोन करून ही दु:खद बातमी कळवली.

'आम्ही निघतो आहोत. पण वेळेवर पोहचू किंवा नाही निश्चित नाही. आपण शेजारील लोकांच्या मदतीने पुढील कार्य उरकून घ्या' थोरल्याचा फोन.

दुसऱ्या दिवशी दोघेही संध्याकाळी आले. अण्णा त्यांना प्रथमच पहात होते. सर्व कसे अघटित झाल्याचे त्यांनी सांगितले.

'अण्णा, बाबांना तुम्ही कसे नीट सांभाळत असत, त्यांची कशी काळजी घेत असतं' हे ते पत्रांत नेहमी लिहित असत. मोठा आधार वाटत होता त्यांना तुमचा. त्याबद्दल आम्ही तुमचे शतश: आभारी आहोत. त्यांना आम्ही नेहमी सांगायचो. अमेरिकेला या. तेथेच रहा. आम्ही तुम्हाला नीट सांभाळू. इथे एकटे कशाला राहता ? फार हट्टी होते ते. शेवटपर्यंत नाही ऐकलं आमचं.'

'आमच्या दोघांची फार रजा नाही. थोड्याच दिवसात आम्हास निघावे लागेल. अण्णा, तुम्हाला माहीत आहेच. इथे आमचे कुणी नाही. केवळ बाबांना पुणे आवडले म्हणून ते येथे स्थायिक झाले एवढेच. तुम्ही आता येथेच रहायचं. बाबांच्या पश्चात तुम्हीच ही वास्तू सांभाळा. तिला तुमच्या सोबतीची गरज आहे. आम्ही तुम्हाला सर्वतोपरी मदत करू. रहाल ना इथं ?'

आयुष्यात डोकावलेली सुमित्राची सोबत काळाने हिरावली. तिच्या पतीची-मनोहरपंतांची सोबतही फार काळ लाभली नाही. इथं राहिलो म्हणजे त्यांच्या आठवणी पुन्हा पुन्हा आपल्या भोवती फेर धरतील. सहन होणार नाही आपल्याला ते. जगणं अशक्य होईल. अण्णा विचारात पडले.

'काय ठरवलं अण्णा ? रहाणार ना इथे ?'

'नाही, मला ते जमणार नाही. कृपा करून मला हा आग्रह करू नका ही वास्तू आपली आहे. आपण तिचा सांभाळ करा. तिला जपा' अण्णांचा निर्णय पक्का होता.

दुसऱ्याच दिवशी दोन्ही मुलांचा निरोप घेऊन सामान घेऊन ते बाहेर पडले. बंगल्याचे दार लावताना एकदा त्या वास्तूला त्यांनी डोळे भरून पाहिले. डोळ्यातील अश्रू त्यांनी महत्प्रयासाने आवरले आणि जड पावलांनी ते चालू लागले.

आपल्या जागेत आल्यावर त्यांनी घराचे कुलूप काढले. दार उघडले. खिडक्या उघडल्या. वाऱ्याचा एक झोत आला. पुस्तकांची पाने फडफडली. निर्जीव वस्तूंना जिवंतपणा जणू आला होता. सुख समाधानाची एक वेगळीच छटा त्या जागेला आज आली होती आणि ती जागासुद्धा आपला जुना सोबती परत आल्यामुळे झळाळून निघाली होती.

- **प्रभाकर गुपचूप**, आनंदनगर, पुणे ४११ ०५१.
भ्रमणध्वनी - ९६६५८७५१०५

**(पूर्वप्रसिद्धी : 'गंधाली' वार्षिक, दिवाळी अंक २००३)**

## परदेश प्रवासातील सुरक्षा व्यवस्था

तिकिटे व सामान विमान कंपनीच्या स्वाधीन केल्यानंतर पासपोर्ट पासून तुम्ही 'भारताची सीमा ओलांडली' असा शिक्का पासपोर्टवर पडतो व नंतर विमानात शिरण्यापूर्वी सुरक्षा तपासणी होते. त्या काळात होणाऱ्या गमती व आलेले हे काही अनुभव.

बैरूट विमानतळावर एक तास Transit मध्ये फिरल्यानंतर विमानात परत शिरताना सुरक्षा रक्षकाने हटकले, ''तुमच्याकडे काही धातूचे सामान आहे !'' मी ओव्हरकोटच्या खिशातून एक लहान डबी काढून दाखवली. त्यात सासऱ्यांनी सुरक्षित विमान प्रवासासाठी दिलेला अंगारा होता. डबी उघडून तो अंगारा पाहिल्यावर त्याला ती काही स्फोटक पावडर आहे असा संशय आल्याने त्याने विचारले, "Explosive ? Gun powder ?" ते ऐकल्यावर त्या मठ्ठ डोक्याला हसावे की रडावे सुचेना ! मी चटकन एक चिमूट माझ्या जिभेवर ठेवली व म्हटले, "No, no explosive, just Holy ash! For air safety !" त्यावर त्याने मला काही होईल अशा भितीने झटकन विमानात पाठवले. कदाचित मनात म्हणाला असेल, ''तुझे काय व्हायचे ते विमान उडल्यावर होवो, माझ्या देशात नको !''

लंडन-न्यूयॉर्क ह्या प्रवासात ६-८ तासात डोके जड झाल्याने व पोटात चलबिचल झाल्याने जेवण नको म्हटले तर हवाई सुंदरीने काही फळे आणली. त्यातील सफरचंद संपवले व द्राक्षांचा एक छोटा घड बॅगमध्ये ठेवला, विमानतळावर खाता यावा म्हणून ! न्यूयॉर्कला उतरल्यावर सामान घेऊन बाहेर जाताना सुरक्षा अधिकाऱ्याला काय संकेत मिळाला माहीत नाही. त्यांनी थांबवून बॅगेत काय आहे विचारल. मी काही नाही म्हटले तरी बॅग रिकामी करायला लावली व त्यातून द्राक्षे सापडल्यावर 'युरेका' म्हणत ती कचऱ्यात टाकली. का विचारले तर "Vegitables, fruits not allowed" असे सांगितले.

हाँगकाँगला शाकाहारी जेवणाची मारामारी असते असे ऐकल्याने तेथे जाताना शेवेची ३-४ पाकिटे व राजगिरा लाडू बरोबर घेतले. हाँगकाँग विमानतळावरून बाहेर पडताना सुरक्षा अधिकाऱ्याला ती पाकिटे दिसली. तर त्याने दाभणासारख्या लांब सुया शेवेच्या पाकिटातून आरपार नेत त्या विघातक नसल्याची व राजगिरा लाडू सुरीने अर्धे कापून त्यात स्फोटके नसल्याची खात्री करून घेतल्यावर माफी मागत व सामान पुन्हा बॅगेत व्यवस्थित ठेवून माझे "Welcome to Hong Kong" असे म्हणत स्वागत केले.

सिडनी विमानतळावरही सुरक्षा अधिकारी असेच संशयी व विक्षिप्त होते. त्यांनी तळलेले पिवळे केळावेफर्सही कचऱ्यात टाकले. ''आम्हा भारतीयांचे ते मुख्य खाद्य आहे'' असे सांगत असतानाही "Australian Health Dept. does not allow any processed food stuff असे ठणकावले व रिकाम्या हाती सिडनीत प्रवेश दिला!

**- विजय देशपांडे**, मुंबई

भ्रमणध्वनी - ९८७०३५३२४४

## डोळ्यातील विषाणू

*(डोळ्यातून अर्धा फूट लांबीचा विषाणू शस्त्रक्रिया करून जिवंत बाहेर काढणे ही किमया केली आहे डॉ.संजये रुपारेल यांनी आणि या जगावेगळ्या भयंकर अनुभवातून गेले आहेत आपले सभासद श्री.सतीश राजे. त्यांच्याच शब्दात हे अनुभवकथन.... संपादक)*

साधारण जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून माझ्या डोक्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी थोडीशी सूज येऊन डोके दुखायचे हा प्रकार अविरत चालू होता. तिसऱ्या आठवड्यापासून माझा उजवा डोळा लाल होऊन दुखायला लागला व त्याचबरोबर डोळ्याच्या वर व खाली सूज येऊ लागली. दिनांक २३ जून २००९ ला अंधेरीतील डॉ.संजय रुपारेल यांना भेटून मी माझा डोळा दाखवला. त्यावेळी त्यांनी काही डोळ्यात घालण्यासाठी औषधे व गोळ्या दिल्या व तुमचा डोळा ३/४ दिवसात बरा होईल म्हणून सांगितले. त्यांच्या सांगण्याप्रमाणे मला ४ दिवसात बरे वाटले. परंतु ८ दिवसांनंतर पुन्हा डोळा लाल होऊन डोळ्यावरती व खाली सूज यायली लागली. परंतु ह्यावेळी ही सूज जास्त होती. दिनांक ६ जुलैला डॉ. रुपारेल यांना मी पुन्हा डोळा दाखवला. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की हा डोळ्याचा आजार नसून तुम्हाला सायनसचा त्रास आहे. त्यांनी काही चाचण्या करण्यास सांगितल्या. परंतु ३/४ दिवसानंतर एका संध्याकाळी माझा डोळा फार दुखायला लागला व मी बैचेन झालो. दिनांक ८ जुलै रोजी मी पुन्हा डॉ.रुपारेल यांची भेट घेतली. तपासणीअंती त्यांनी मला असे सांगितले की तुमच्या बुबुळामागे एक सूक्ष्म जीवाणू फिरत आहे. डॉक्टर म्हणाले, 'माझ्या २५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मी अशी केस पाहिलेली नाही, त्यानंतर त्यांनी आपल्या बऱ्याच डॉक्टर सहकाऱ्यांना फोनवरून विचारणा केली असता त्यांच्याकडूनही अशा प्रकारची केस बघण्यात नव्हती. त्याचबरोबर डॉ.रुपारेल यांनी असेही सांगितले की, ''सदर जीवाणू डोळ्यातून काढणे अत्यावश्यक आहे; कारण तो जीवाणू जिवंत आहे. नंतर तो डोक्यात गेला तर तुमच्या जीवाला धोका निर्माण होईल.''

त्या दिवशी रात्र बरीच झाली होती. म्हणून आम्ही काहीच निर्णय घेऊ शकलो नाही. ती रात्र मी आणि माझ्या पत्नीने जागून काढली. परंतु दिनांक ९ जुलैला डॉ.रुपारेल यांनी स्वत: दूरध्वनी करून त्या आजाराचे गांभीर्य आमच्या लक्षात आणून दिले. ताबडतोब आम्ही सकाळी १० वाजता साकीनाका, मुंबई येथील 'पॅरामाऊंट हॉस्पिटल'मध्ये दाखल झालो. तेथे डॉ.रुपारेल यांनी शस्त्रक्रियेची तयारी केली होती. त्यानंतर माझ्या डोळ्याचे ऑपरेशन करायला साधारण एक तास लागला. डॉ.रुपारेल यांनी अतिशय काळजीपूर्वक व कौशल्याने त्या जीवाणूस बाहेर काढले. त्यावेळी त्या जीवाणूची लांबी ६ इंचापेक्षा जास्त होती व तो जिवंत होता. डोळ्याला इजा न करता तो जीवाणू डोळ्यातून अखखा जिवंत काढणे ही किमया डॉक्टरांनी केली. डॉ.संजय रुपारेल ह्यांच्या रूपात मला देवच भेटला असे वाटले.

**- सतीश राजे**, अंधेरी (प.) मुंबई

दूरध्वनी : ०२२-२६७७१७७८

## हायवेवरचा बबन्या

उद्या सुट्टी रविवार. कसलीच घाई नाही की गडबड नाही. थोडं जास्त वेळ लोळत पडलो तरी हरकत नाही असा विचार करून निद्रादेवीचे अधीन झालो. पण कसचं काय ! नळावर भांड्याच्या आवाजानेच नेहमीच्या वेळेवर जाग आली. अलिकडे अलार्मच्या घड्याळ्याची गरजच उरली नाही.

झालं. हा बेत तर फसला. मग दुसराच विचार डोक्यात आला. झटपट सर्व उरकलं अन् सरळ बस स्टेशनला गेलो. वाटेत दोन बिस्किटाचे पुडे खांद्यावरच्या पिशवीत टाकले. सोबत वर्तमानपत्र.

तिथे पोहोचलो तर समोरच एक बस सुटण्याच्या तयारीत होती. प्रवासी सोडायचा नाही तर बसमधे कोंबायचा ह्या निर्धाराने कंडक्टर घंटी वाजवत होता. अजून कुणी चढला तर बरं. त्याची भिरभिरणारी नजर माझ्यावर पडलीच. त्याने खुणेनेच विचारले. कुठे जायचे? ''माहित नाही'' हे उत्तर अर्थातच मी मनातल्या मनात दिलं. चढलो बसमध्ये. कंडक्टरचे बाजूचे सीटवर बसलो. डबल मारली अन् बस सुटली.

शहराबाहेर बस आल्यावर कंडक्टरची टिकटिक, दांडा वाजवणं सुरू झालं. त्यांची सुरूवात कधी शेवटच्या बाकापासून होते तर कधी पहिल्या. सर्व प्रवासी तिकिटधारी झाली. कुणी अंगठीत खोचली, कुणाच्या पर्समध्ये गेली. कुणी नुसतीच न्याहळत होती, तर कुणी त्या कपट्याची बेरीज व त्यांनी मोजलेले पैसे ह्याचा मेळ जमतो का ते बघत होते. ओळखपत्र दाखवून 'हाफ तिकीट' घेणारे थोडे होते. उरलेली चिल्लर परत करायला सहसा कंडक्टरजवळ पैसे नसतातच. एक-दोन प्रवाशांनी त्यासाठी वाद घातला. मग चालत्या बसमध्ये कंडक्टरने सराईतपणे टिकीटाच्या मागे 'अभिवचन' लिहून दिलं. इतकं सर्व आटोपून ते महोदय परत आपल्या हक्काच्या जागेवर येवून बसले. मीच एकटा तिकीट घ्यायचा राहिलो होतो.

बोला, कुठे चालला ? कंडक्टरचा प्रश्न - माझ्याजवळ उत्तर नव्हतं. मी त्याला हळूच म्हटलं, शेदीडशे घरं असलेल्या खेड्यात. हे ऐकले मात्र अन् त्याने मला आपादमस्तक न्याहाळलं. तो म्हणाला, ''अहो राव, ही लाँगरूटची बस आहे. अति जलद. कोणत्याही लहान गावात थांबायची नाही. आता असं करा, कंडक्टरचा सल्ला. मी तुम्हाला पुढच्या स्टॉपचं तिकीट देतो. तिथं उतरायचं. तिथून ऑर्डिनरी बसने जिथे जायचे तिथे जा.'' देव तुमचं भलं करो हे मात्र त्याने मनातल्या मनात नक्कीच म्हटलं असणार.

मी त्याला म्हटलं , ''तिकिट तुमच्या मोलाच्या सल्ल्याप्रमाणेच द्या पण माझ्यावर एक मेहरबानी करा. एखाद्या लहान खेड्यात मला उतरवून द्या.''

''मोठं कठीण काम सांगितलंत राव'' - गंभीर चेहऱ्याने तो उद्‌गारला, ''हा ड्रायव्हार फार खडूस आहे, ऐकणार नाही.''

थोडा विचार मलाही करावा लागला - कंडक्टरला विश्वासात घेऊन त्याला हळू आवाजात म्हटलं, ''तुम्हाला तर या हायवेची खडान् खडा (खड्ड्यांसहित) माहिती आहे - खेडं दिसलं की मला इशारा करा - मी पोट दाबून करंगळी दाखवीन - एक नंबर म्हणेन - सिंगल मारायची - मी झटकन उतरेन मग लगेच डबल मारायची.''

ठरल्याप्रमाणे झाले. ड्रायव्हरने रागाने मागे वळून पाहिलं. कंडक्टरचा तेवढा अधिकार ड्रायव्हर नाकारू शकला नाही. पुढे त्या दोघांचं काय झालं, ते देवच जाणे !

चार पदरी हायवे - एकामागून एक बसेस. ट्रक्स, गाड्या सुसाट वेगात जात येत होत्या. मी चटकन् कडेला झालो - पिशवीतून कंगवा काढला. केस नीट बसवले - निघालो. एक शेत ओलांडलं. खेडेगाव दिसलं.

बिसलरीच्या रिकाम्या बाटल्या, टिनचे डबे हाती घेऊन काहीजण गावाकडे परतताना दिसले. ''व्होऽल वॉवर इज युवर्स - गो ॲन्ड डू'' हे वाक्य लक्ष्मणरावांना इथे तर नसेल सुचलं ? माझा एक तर्क.

बैलगाडीचा रस्ता, कुठे वर तर कुठे खाली. आपण पडू नये, पाय दुमडू नये म्हणून शक्यतो खाली बघूनच चाललो होतो. गावात पोहोचलो. प्रयोजन काहीच नव्हतं. इथे कुणी ओळखीचे असणारे - तेही शक्य नव्हतं. ह्या खेड्याचं नाव सांगणाऱ्या पाटीवर नेमकी जाहिरात चिटकवली होती.

आखरातल्या विहिरीवर पंप चालू होता. रस्त्याच्या कडेला थोडी मोकळी जागा होती. एकपाखी घर दिसलं. छपरावर कंबरेला गोणपाट गुंडाळून एकजण कौलं शाकारत होता. घरासमोर मोकळ्या जागेवर बसलेल्या म्हाताऱ्याने आवाज दिला. ''वामन्या इचकाटा पायशील - कौलाखाली असत्यात.'' तिथेच एक बाई बकरीचं दूध काढीत होती. बकरीचा हासुद्धा उपयोग असतो हे मला तेव्हाच कळलं.

आणखी पुढे गेलो. एक कोंबडी तिच्या परिवाराला घेऊन उकिरड्याला प्रदक्षिणा घालत होती. थोड्याच अंतरावर एक मरतुकडं कुत्रं तिच्याकडे बघत होतं. बहुधा अहिंसावादी असावं.

आता गावकऱ्यांच्या नजरा हळूहळू माझ्याकडे वळायला लागल्या. आपापल्या परीने अंदाज बांधले जाऊ लागले. कुजबूज व्हायला सुरूवात झाली. पदराआडचं पोर पूर्ण झाकल्या गेलं.

मला स्वत:ला सर्व दिशा सारख्याच होत्या. थोडासा रेंगाळत पण गावाचे एकंदरीत स्वरूप न्याहाळत चालत होतो. तेवढ्यात समोरून एका पोराने जोरात आवाज दिला, ''म्हैस मारकी आहे बाजूला व्हा.'' त्याने कोणाला म्हटले हे लक्षात यायच्या आतच एक म्हैस चौखूर उधळत पुढे निघून गेली. मी क्षणभर अवाक् झालो. हायवेवरची वर्दळ ऐकू येत होती.

तो पोरगा जवळ आला. काळं बनियन अन् अर्धी चड्डी - त्यानेच विचारलं, ''कुणाचे पावने ?'' मी सहज गमतीनं उत्तर

दिलं, ''देवाचा पाहुणा''. तो चटकन् म्हणाला, ''देव गुरूजीचे?'' इथं कुठं माहित होतं की देव गुरूजी कोण आहेत ते - पण मग मात्र त्याने मला सोडलंच नाही.

''चला, मी दावतो गुरूजींचं घर. फार लांब नाही. तसं आमचं खेडं लहानसचं आहे पण 'हायवे' वर हाय ना. एक बी गाडी थांबत नाही. सूं सूं करत जातात. कधीमधी एखवादा मानूस, जनावरं तुडवून जातात. कुत्र्यांचा तर हिशेबच नसतो. पण आमी - आमी गाववाले तरी बी खुस. हायवेवर राहतो ना !'' तो सांगतच सुटला.

''एक डाव, एक बाई अडली - चार लोकांनी तिला खाटेवर टाकून हायवेवर आणली. शहरात नेनं जरूर होतं. गाडीचा प्रॉब्लेम, हात दाखवा, हात खाली करा - हात दाखवा - हात खाली करा. च्या मारी - एक बी बस, ट्रक, कार थांबायले खाली नाही - मग, केली एक युगत हायवेवर एक दोरी आडवी धरली - पण त्याचेवर टाकायचे लाल कपडा पायजे होता. बाई अडलेली. येळ महत्वाची. जवळच मारोतीचा पार - गेलो धावत अन् आनली त्याची लंगोट सोडून. मंग काय ! गाड्यांची लाईनच लागली - बाई दवाखान्यात.''

''अरे पण त्या मारोतीचं काय ?'' न राहवून मी त्याला विचारलंच. तर म्हणतो कसा - ''मारोती ब्रम्हचारी आहे. कायबी धोका नाही.'' ह्यावर मी काय बोलावं.

चार पावलं पुढे गेलो - ''काय रे तुला बऱ्याच गमती जमती माहित असतील ?'' मी विचारलं.

''हो ना ! एक का दोन किती सांगू ?'' तो खुलला. ''तो बापूराव, सकाळी दहानंतर कुठं जातो माहित आहे ?'' थोडं थांबून त्यानेच उत्तर दिलं, ''तो जातो गणपतच्या घरी. चक्कीची टूक टूक सुरू झाली की बापूरावले आपसूकच कलते गणप्या गेला चक्कीवर कामाले. दुपारपर्यंत बापूरावची मजा.''

''आमच्या गावात चोरी नाही होत. जहागीरदाराचं एकच मोठं घर हाय. पण त्याच्या दारावर दोन पेहलवान अन् पडवीत दोन बंदूका. बाकीच्यांच्या घरात उंदराची खडखड.'' पोरगा सांगू लागला.

त्याच्या गोष्टी ऐकत पाय पुढे पडत होते. एक चहाची टपरी लागली - चहा अन् भज्याशिवाय काही नव्हतं. ''बबन्या ! आज चहा नाही पेत काबे ?'' त्या टपरीवाल्याच्या हाकेनं कळलं की आमचा गाईड म्हणजे बबन्या.

''चला पावनं, चहा पाजतो'' इति बबन्या.

चहा मला पण हवाच होता. टपरीसमोर एक 'तग' धरून असलेला बेंच होता. मी त्यावर टेकणार तोच बबन्या ओरडला - ''इथं नाही - जरा साईडनं.'' मला आश्चर्य वाटलं. ''का ?'' म्हणून त्याला विचारलं तर त्याने झाडावर बोट दाखवलं. झाडावर कावळ्यांची शाळा भरली होती. ऑफ पिरियडसारखा गोंगाट - वर कावकाव करीत खाली टपटप सडा टाकत होते. ह्या गडबडीत मला प्रसाद मिळालाच. पण बबन्याने लगेच पाणी आणून स्वच्छ करून दिलं.

काचेच्या जाड पेल्यातून चहा प्यायलो. चहा पिताना मी बबन्याला विचारले, ''काय रे ? हे सगळं तुला आधीच माहित असतं ?'' उगीचच भाव खात तो म्हणाला, ''आगे की सोच.'' मला काही न उमगल्यामुळे मी त्याला परत विचारलं, ''म्हणजे काय ?''

''त्याचं काय राजे हो - आमचं गाव तर आहे हायवेवर, पण शिनिमा पहायले दोस्ताबरोबर दुसऱ्या गावच्या टूरींग टॉकीज. देवीची जत्रा होती तवाच पाह्यला होता 'आगे की सोच'.''

पायाखालचा रस्ता हळूहळू सरकत होता. एका ठिकाणी फाटक्या पोत्यातून सांडल्यासारखी गव्हाची धार दिसली. ''अरेरे!'' मी उद्गारलो.

''हे गहू सांडलेले नाहीत. टाकलेले आहेत. त्या समोरच्या झाडाखाली आसरा आहेत. त्याहिचा नवस आहे हा. गरीबाले पसाभर नाही देनार. इथं मातीत घातले'' बबन्याने माहिती पुरवली.

बबन्या जवळचा साठा अमर्याद होता. मी म्हटलं, ''बबन्या ! तुला तर इत्यंभूत माहिती आहे.'' इथे मोठी गंमत झाली - इत्थंभूत ऐवजी ''इथं भूत '' असं त्याला वाटलं अन् झाला सुरू. मला वेताळ विक्रमाची आठवण झाली.

''पावनं, आहे इथं एक 'ओझा'. आजूबाजूच्या गावचे लोक कधी मधी येत असतात. सांगवत नाही पण सांगतोच. घुमणारी बाई - खोली बंद. कापडं बाहेर फेकते. थोड्या किंकाळ्या - कण्हणं - जावू द्या. साडीले चिचीच्या झाडाले बांधून यायले सांगते - भूत गायब. त्या झाडाले पाचपंचवीस साड्या बांधलेल्या दिसतील.

रस्त्याच्या बाजूला एका अंगणात एक बकरी ओरडत होती. बबन्या स्वत:शीच पुटपुटला. ''दुपारपर्यंत होते.''

गावगाड्यात सारंच चालते, कडब्याची गंजी पेटवनं, गवऱ्या पळवनं, गावाले लागून नाला आहे. शेवंता लोखंडाच्या टोपल्यात धुणं घेवून बरोऽबर १२ वाजता जाते - पोट्टे टपलेलेच असतात. सोबतीले जातो म्हणतात - आता बोला'' बबन्याचा धबधबा कोसळणं चालूच.

बनियनच्या आतल्या खिचातून बबन्यानं विडी काढली. पेटवली. अन् बिनदिक्कत झुरका मारला - नंतर त्या बिडीचं खालचं टोक किंचित तोडून विडी माझ्या हातात दिली. ''घ्या - घ्या एक झुरका'' बबन्याचा प्रेमळ आदेश.

विडी-सिगारेट कधीच न ओढणारा मी एकदम दचकून गेलो - ती विडी बोटात धरतादेखील येत नव्हती. शेवटी त्याला माझी कीव आली. तो चटकन म्हणाला, ''बरं राहू द्या'' माझ्या हातातून विडी काढून घेऊन तो सुरू झाला.

माझं मात्र कुतुहल जागं झालं. त्याने विडीचं टोक का तोडलं? बबन्याला विचारलचं, ''एक विडी दोघं ओढतात तवा

असंच करावं लागते.'' माझ्या शंकेचे निरसन हे असं.

मी त्याची थोडी गम्मत करावी म्हणून विचारलं, ''बबन्या, तुला पोखरण माहित आहे ?''

''बापा, पोखरनं ! इथं तर ढोपरानं पोखरतात - एक का दोन. किती सांगू ? पांडोबा, ग्रामसेवक, शाळेतले गुरूजी'' बबन्याचं चऱ्हाट सुरू झालं.

''गुरूजी'' हा शब्द उच्चारल्याबरोबर तो भानावर आला - ''पावनं ! आपण गावाले आतापावेतो दोन राऊंड मारले - देव गुरूजींचं घर आता त्या शेज्याले रायलं'' बबन्याचा अपराधी स्वर.

मला तरी कुठे जायचे होते देव गुरूजींकडे. मी अवतीभवती नजर फिरवली. बकरी दोहणारी बाई, गोट्या खेळणारी पोरं, चिंचोक्याचा डाव, एखाद्या विहिरीवरून घागरी भरून आणणाऱ्या त्या खेड्यातील बाया - सगळं खेडं डोळ्यात साठवून घेतलं. क्षणभर तसाच उभा राहिलो.

बबन्या मधेच म्हणाला, ''तसं आमचं गाव हायवेवर आहे.''

**- दि. [illegible]**, नागपूर

भ्रमणध्वनी - ९८९००१६७००

## घाल एकतरी शीळ !

दिस कलला कलला, उन्हे उतरली खाली
म[illegible] मनाचा स्वर हे, परतीची वेळ झाली !
बळ आलिया पंखात, झेप घेतली आभाळी,
बळ जेवढे तितुकी, कव नभास घातली,
दिस चढला केधवा, मुळी कळलेच नाही
कधी कलला हा दिस, तेही उमगले नाही
पिले झाली पहा मोठी, त्यांना पुरेना घरटे
दिस कलल्याची खूण, तेव्हा आपसूक पटे ।
पिले होतातच मोठी, जगरहाटीप्रमाणे,
जधी हवे, तधी तुवा, दिले चोचीमध्ये दाणे ।
पण एवढेच का रे, तुझ्या जीवनाचे सार ?
पिले, घरटे, आणिक दीड वितींचा संसार ?
दिस कलला तरीही, आहे अजूनही वेळ
दिस कलला तरीही, गेली नाही बघ वेळ
घे भरारी, विसर भूतकाळ
उद्या स्मरतील अशी, घाल एकतरी शीळ
घाल एकतरी शीळ !

**- प्रतिभा खरे**, मालेगाव (नाशिक)

## राष्ट्रप्रेम

आमचं राष्ट्रप्रेम औट घटकेपर्यंत टिकतं
राष्ट्राकरिता मरायला मन तयार नसतं ।
रक्त आमचं राष्ट्रप्रेमाने जेव्हा केव्हा पेटेल
आतंकवाद, दहशतवाद तेव्हाच भारतातला मिटेल ।

**- पी.बी.भेंडे**, पुसद

# भारतीय संस्कृती

आपली भारतीय संस्कृती सर्वांनी टिकविली पाहिजे. भारतीय संस्कृती पुरातन व सर्वश्रेष्ठ आहे. याबद्दल कोणीही शंका बाळगायला नको. ती सर्वश्रेष्ठ आहे त्यामुळेच सर्व विश्वाची चिंता करते. देशाच्या सीमा ओलांडून 'हे विश्वचि माझे घर' किंवा 'वसुधैव कुटुंबकम्' हा विचार आपल्या संस्कृतीत सर्वप्रथम मांडला आहे.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' कोणत्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करीत रहा हा मौलिक विचार भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण आपल्याला देतात. हा आपल्या संस्कृतीचा पाया आहे. आजही परदेशात भारतीय तरुण डॉक्टर, इंजिनिअर, परिचारिका, ड्रायव्हर्स यांना प्रचंड मागणी आहे. याचे कारण कर्मयोगात आहे. आपल्या सुशिक्षित व सुसंस्कृत भारतीय तरुणानांच का मागणी आहे. याचा विचार प्रत्येकाने आपल्या मनाशी करावा.

आपली संस्कृती जगात नावाजली जाते. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, रविशंकरजी, बाबा रामदेव, कवि कालिदास यांच्या विचारांना परदेशातूनही प्रतिष्ठा मिळते आहे. परदेशात कृष्णाची भक्ती केली जाते. कृष्णाची देवळे उभी करून त्याची भक्ती करून परदेशात सुखाचा शोध घेतला जातो. त्यांच्याकडे पैसा आहे. पण मन:शांती नाही. पैशानेच सर्व सुखे मिळतात हा विचार मागे पडत चालला आहे.

वास्तुशास्त्र, ज्योतिषशास्त्र, शिल्पकला, आध्यात्मिक प्रगती यात पूर्वी आपण जगात अग्रेसर होतो. आपला वारसा आपणच विसरत चाललो आहोत. क्षेपणास्त्रे, अणुबॉम्ब, टेस्ट ट्यूब बेबी हे सर्व प्रकार आपल्या पूर्वजांना माहीत होते. त्यावर संशोधनही झालेले आहे. क्षेपणास्त्रांचा वापर रामायण महाभारतात झालेला आहे फक्त आपण त्यावर विश्वास ठेवत नाही. किंबहुना त्यावर विश्वास ठेवू नये असे शिक्षण आपणास दिले गेले आहे.

गुरुपौर्णिमा ही संकल्पना आपल्याकडे आहे. त्यादिवशी आपल्या गुरूंना वंदन केले जाते. गुरुकुल शिक्षण पद्धती ही आपली शिक्षण पद्धती पूर्वीच्या काळी रूढ होती. हल्लीच्या शिक्षणाने भारतीय संस्कृती व परंपरा विसरल्या जात आहेत. स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाली तरी सुद्धा आपण ब्रिटिश पद्धतीचे शिक्षण चालू ठेवले आहे. या पद्धतीत चांगले संस्कार घडविणारे बदल करावयास हवेत.

आपले सण व आपल्या परंपरा यांना आपलेच लोक नावे ठेवतात. त्यांना पुरोगामी समजले जाते. आपल्या संस्कृतीत पंचमहाभूतांना महत्त्व दिले आहे. आजही सर्व नद्या जोडण्याचा एक मोठा प्रकल्प हाती घेतला तरी भारतात सुवर्णयुग अवतरू शकेल.

**- सिताराम तेरवाडकर**, सांगली

भ्रमणध्वनी - ०९४२२०४१५०४

# लघुकथा -सप्तक

## परमपद

चित्रगुप्त न्यायनिवाडा करायला बसले होते. त्यांचा मदतनीस त्यांच्याजवळ उभा होता. पृथ्वीवरील मृतात्म्यांची भलीमोठी रांग लागलेली. एकेकाचे संचित मदतनीस तत्परतेने वाचून दाखववायचा. चित्रगुप्त नरक किंवा स्वर्ग देण्यास सांगायचे. अलम् विश्वाचे हे अत्युच्च न्यायालय, तत्काळ सुनावणी, तत्काळ न्यायदान, तत्काळ अंमलबजावणी ! कोठे ढिलाई नाही, वशिलेबाजी नाही की पक्षपात नाही.

''महोदय, हा धान्यदाण्याचा व्यापारी, शिधावाटप केंद्रातील धान्य गैरमार्गाने घेऊन काळ्या बाजारात विकायचा. जनतेला भेसळमिश्रित धान्य, तेल द्यायचा. कृत्रिम टंचाई निर्माण करायचा'' मदतनीसाने वाचले.

''ह्याला सरळ नरकात न्या.'' चित्रगुप्ताचा सडेतोड न्याय.

''महोदय, हा मंत्री होता. प्रचंड भ्रष्टाचार केला. सर्व नीतीमूल्ये पायदळी तुडवली. पैशासाठी देशद्रोह केला. गरिबांचे फार शोषण केले. देशाची अपार संपत्ती हडप केली. अबलांवरही अत्याचार....''

''ह्याला तर सेवकांनो, रौरव नरकात दीर्घकाल डांबा''

न्यायदानाचे काम व्यवस्थित चालू होते. प्रत्येक मृतात्म्याला काटेकोर न्यायाने शिक्षा मिळत होती. बहुतेकांना नरकात, एखादा-दुसराच स्वर्गात पाठवला जायचा.

''महोदय, हा एक सामान्य गृहस्थ होता. ह्याने साधे, सरळ व अगदी प्रामाणिक आयुष्य व्यतीत केले. गरीब, दीनदुबळ्यांची मनोभावे सेवा केली. कुवत नसतानाही त्यांना आर्थिक मदत केली. स्वत:च्या मुलांना शिक्षण देऊन उत्तम नागरिक केलेच पण इतर गरीब विद्यार्थ्यांनाही नेहमी मदतीचा हात दिला. गरजूंच्या हाकेला अपरात्रीही साद दिली.''

''उत्तम ! सेवकांनो ह्याला सन्मानाने स्वर्गात न्या...''

चित्रगुप्त न्यायदान करत होते. इतक्यात तो मृतात्मा विनयाने म्हणाला, ''थांबा चित्रगुप्तजी, मला स्वर्ग नको. अहो मी अजून काहीच पुण्यकर्म केलेले नाही. मला पुन्हा जन्म द्या. दु:खितांचे अश्रू पुसण्याची, मानवसेवा करण्याची बुद्धी द्या. माझा स्वर्ग खरंच मला त्या अभाग्यांच्या सेवेत लाभतो.''

आणि सद्गदित झालेले चित्रगुप्त स्वत:च त्या मृतात्म्याला परमपद स्थानावर नेण्यासाठी उठले.

## नेहमीचेच

नेहमीची रात्र. नेहमीचा चंद्र. नेहमीचे तारे, नेहमीचे वारे, नेहमीचे आकाश, आकाशाखाली नेहमीचे झाड. झाडाच्या पारावर नेहमीचे प्रेमीयुगुल.

''ए, किती वर्षे आपण असे भेटतोय नाही ?'' प्रेयसी म्हणाली.

''हो ना, खूप खूप वर्षे '' - प्रियकर

''ना तू बदललास, ना हे झाड, ना हा चंद्र, ह्या तारका, हे आकाश, ही रात्र'' प्रेयसी धुंदीत बोलत होती. व्याकुळलेले डोळे प्रियकरावर लागले होते. तिचे रेशमी केस भुरुभुरु उडत होते. मंद मंद वारा वाहत होता.

प्रियकर गोड हसला.

''का हसतोयस् रे माझ्या राजा ?''

''तू ना अगदी आता देविकाराणी दिसतेस गं ! भावुक, भावभरल्या डोळ्यांची नाजूक गोरीपान.....''

''खरंच ? आणि तूही मला अशोककुमारच वाटतोयस रे. निरागस हसताना गालावर खळ्या पडणारा. पण चल, आता रात्र संपत आली आहे. आता आपण झोपू या.'' प्रेयसी म्हणाली.

आणि मग, एकमेकाचे देविकाराणी - अशोककुमार असलेले ते दोघे शांतपणे आपापल्या थडग्याकडे जाऊ लागले.

चंचल वाऱ्याच्या झुळुकीने पाचोळा गर्रकन् फिरले.

..... आणि मग सगळीकडे नीरव शांतता पसरली !

## सुरक्षित

मंदिराच्या कळसाचा दगड मोठ्या दिमाखात उभा आहे. त्याच्यावर सोन्याचा पत्रा चढवला गेला आहे. लांबून जाणारे भाविकजन त्याच्याकडे पाहात नमून जाताहेत. गर्वतर सुवर्ण झळाळीसह झळकत आहे. पायाचा दगड निमूटपणे खोल आत आहे. कोणालाही त्याचे नखभर दिसणे नाही. स्थिर, निवांत, अचल ! आपल्या माथ्यावर देवमूर्तीसह संपूर्ण मंदिराचा भार वाहतोय. गर्वाचा लवलेशही नाही.

एका रात्री अचानक वादळ, झंझावात, विद्युल्लतांचा कडकडाटी कल्लोळ -- आणि कळसाला झालेला विद्युत-लोळाचा ओझरता स्पर्श!

कळसाचा दगड चांगलाच दुभंगलाय.

पायाचा दगड मात्र निश्चल आहे. शांत आहे ! प्रसन्न वरदायी मूर्तीच्या चरणाखाली तो पूर्ण सुरक्षित आहे..... अगदी कायम !

## क्षण

क्षणभरही न थांबता क्षणोक्षणी फिरणारे कालचक्र....

त्याबाजूला भूतकाळातले अनंत क्षण, मागेमागे दूरदूर जाताहेत, कधीही परत न येण्यासाठी !

येथे वर्तमान, आलेला क्षण म्हणतोय, ''फार एकटं एकटं वाटतयं.''

''थांब रे, अरे तुझ्या मागोमाग बघ आम्ही आहोतच.''

भविष्यातल्या अमोज्य क्षणांचा गलका !

आणि पाहता पाहता वर्तमानाचा तो क्षण भूतकाळाच्या अपार क्षणात विलीन झाला, कधीही परत न येण्यासाठी !

कालचक्र क्षणभरही न थांबता क्षणोक्षणी चालूच राहिले.

## दागिना

एक मोठ्ठा रस्ता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला कसली-कसली दुकाने. दुकानात उंची माल खच्चून भरलेला. त्यामध्ये एक, जवाहिऱ्याची विशाल पेढी. नानारंगी विद्युत-रोषणाईने दुकान झगमगतेय आणि रत्नजडीत सुवर्ण दागिनेही शोकेसमध्ये झळाळताहेत. महागड्या कार्समधून उतरणाऱ्या धनदांडग्या ग्राहकांची रेलचेल !

दुकानाच्या शोकेसजवळ फाटक्या मलीन वस्त्रातले एक जोडपे उभे. ''ए चल आता, किती वेळ उभी राहिली आहेस ग ? मोठ्या लोकांचे हे दुकान आहे. अग आपल्यासारख्यांनी तर येथे खरेदी करण्याचे स्वप्नसुद्धा पाहू नये !'' भान विसरून शोकेस पाहत असलेल्या बायकोचा हात खेचत नवरा म्हणाला.

''अहो थांबा हो जरा. पाहायला काय पैसे का लागतात ? पाहू या ना श्रीमंतांचे दागिने कसे असतात ते !''बायको नाराजीने म्हणाली. दागिन्यांच्या स्त्रीसुलभ आवडीमुळे तिचा पायच निघत नव्हता. जणू ती एक सुंदर स्वप्नच पाहात होती.

'ए दळींदर, खिसको यहाँसे, चोरी करनेका सोच रहे हो क्या?'' म्हणत दुकानाच्या उग्र, धिप्पाड रखवालदाराने हातातल्या जाडजूड दंडुक्याने तिच्या हातावर जोराने फटका मारला.

कच्कन काचेच्या बांगड्या फुटल्या आणि तिच्या हाताला भलीमोठी जखम झाली. नवऱ्याने लगबगीने स्वत:चा फाटका रूमाल काढून तिच्या हाताला गुंडाळला.

डोळ्यांतून अश्रूंची धार, मनगटातून रक्ताची धार ! रुमाल लालभडक चिंब झाला.

दोघेही पेढीतून मिळालेला हा नवीन, जगावेगळा 'दागिना' हातावर मिरवत मुकाट्याने चालू लागले.

थोड्या वेळातच शोकेसजवळ सांडलेल्या रक्तावर बदाबदा पाणी ओतण्यात आले. पुन्हा सर्व साफ, चकचकीत झाले.

दुकानातील वर्दळ नेहमीसारखीच चालू राहिली.

## मायाबाजार

प्रचंड रडारड. सगळे शोकमग्न. मृताची पत्नी तर अगदी करुण हंबरडा फोडून रडतेय. आप्त-स्वकीयजन मोठा आकांत माजवताहेत. कुणाच्याही डोळ्यात आसवं उभी करणारा हा प्रसंग!

''पाहिलेस, माझ्यावर किती प्रेम आहे माझ्या पत्नीचे, माझ्या मुलांचे, माझ्या नातलगांचे ? बघ बघ यमदूता, दगडालाही पाझर फुटला असेल तरीही तू निर्विकारच ? तुला वाटत नाही असे की माझे प्राण तू माझ्या निष्प्राण देहात परत द्यावेस म्हणून ?'' मृत व्यक्ती यमदूताला म्हणतेय, ''मी जिवंत झालो तरच हा हृदयद्रावक विलाप थांबेल ! माझ्यावरील ह्या सर्वांच्या अलौकिक प्रेमासाठी तरी मला परत जाऊ दे रे.''

''ठीक आहे'', यमदूत क्षणभर विचार करून उत्तरला, ''मी तुला जीवदान देईन पण तुझा एक तरी आप्तस्वकीय तुझ्याऐवजी मला न्यावाच लागेल. मान्य आहे का तुला ?''

''एकदम मान्य'' मृत व्यक्तीचा अगदी ठासून होकार.

मृतदेहाभोवती विलाप करणाऱ्या मंडळींवर एक काळीकुट्ट सावली..

''...मी यमदूत आहे. तुमच्या सर्वांच्या ह्या प्राणप्रिय व्यक्तीचे प्राण मी परत देतोय. अट एकच, तुमच्यापैकी कुणीही एकाने आत्ता, या क्षणी माझ्याबरोबर यायचे आहे.''

टाचणी पडली तर आवाज होईल अशी निर्मम शांतता, सर्व चिडीचूप, नातलग एकेक करून बाहेरचा रस्ता पकडताहेत.

मृत व्यक्तीचा मुलगा आईला म्हणतोय, ''आई, तू जा. माझे अवघे जीवन पुढे आहे. अग, मी अजून नीट जगलोयच कोठे ? तुझा पती गेलाय् त्याला तूच परत आण.''

मृत व्यक्तीची पत्नी गडबडून म्हणतेय, ''अरे मुला मी गेले तर माझ्या सुनेची बाळंतपणे कोण बरे करणार ? नातवंडे-पतवंडे कोण सांभाळणार ? तुझ्या बाबांच्या प्रदीर्घ आजारपणामुळे अगदी कंटाळले होते रे मी ! बरे झाले, एकदाची पीडा गेली आपल्या घरातून, सुटले मी !''

आणि तो मृतात्मा अगदी निमूटपणे यमदूतामागे झरझर जाऊ लागला. दूर.... या मायाबाजारापासून दूर !

## राखरांगोळी

एक प्रचंड डोंगर. डोंगरावर बरीचशी डेरेदार झाडे - फुलाफळांनी ओथंबलेली. झाडांवर बरेचसे नानारंगी पक्षी. पक्षांचा मधुर किलबिलाट. त्या किलबिलाटाला साथ द्यायला झुळझुळ वाहणारे निर्झर. जमिनीवर मंद मंद दरवळणारे फुलापानांचे सडे. शीतल वाऱ्याच्या मंद चंचल झुळुका उगाचच त्यांना सतावीत आहेत. त्यावर श्वापदांचा दबला पदरव. आकाश दिसतंय आणि दिसत नाहीही. उंच उंच वृक्षांची गर्द पर्णराई वर बेगुमान दाटली आहे. भर मध्यान्ही सांजवेळेचा आभास. सगळीकडे नीरव शांतता !

आणि आता.... तोच डोंगर ...... अर्धामुर्धा झालेला. बरेचसे खडक कातळ दाखवत असलेला. स्टोनक्रशर्सचे कर्कश्य आवाज. आवाजाला साथ द्यायला बराचश्या मजूरांचा तारस्वरात गलका आणि घणघमल्यांचा तीव्र खणखणाट. सुकलेले निर्झर. मरगळलेली उरलीसुरली खुरटी खुडकी झुडपे. वर भोकाड पसरल्यासारखे भकास आकाश - डोंगराचे अखेरचे वेदनामय पर्व पाहात असलेले! सुन्न, सुने !

एका मुग्ध स्वप्नाची राखरांगोळी निसर्ग अगतिकपणे प्रत्यक्ष पाहतोय. त्याच्या कुशीतला मानव त्याचीच निर्घृण हत्या करतोय.

माहित असेल का त्या मानवाला की आपण आपलेच भविष्य किती भयाण करून ठेवतो आहोत म्हणून ???

**- विवेक ठाकुर,** मुंबई.
दूरध्वनी - २४३००३२५

## उत्तर कोण देईल ?

गोष्ट तशी जुनी. म्हणजेच बरीच जुनी. सबअकाउंटंटचे स्केल वन ऑफिसर झाले ना, तेव्हाची ! प्रमोट झालो आणि बँकेनं लगेच बारसं केलं. एजंटचे ब्रँच मॅनेजर्स झाले तेही तेव्हाच.

लेदर बाउंड जाडजूड लेजर्स होती. जनरल लेजरमध्ये बॉलपेनचं लिखाण हळूहळू चालू झालं होतं. शाईची पेनं हळूहळू मागे पडत होती. इंपीरीयल बँकेची मोठीच्या मोठी पासबुकं अजून लोक आणत होते. तर त्या दिवशी सोमवार होता. जूनची दोन तारीख. एक तारखेला रविवार आला की दुसऱ्या दिवशी बँकेला पेंशनरांचा वेढा.

त्या दिवशी बँकेत एकच काम व्हायचं. सेव्हिंग्ज मधले पैसे देणे. सकाळी सव्वा दहाला सुरूवात. कधी कधी पाच साडेपाचपर्यंत पैसे देत रहायचं. दहा वाजले होते. कमीतकमी तीन-चार तास तरी खुर्चीतून हलायला मिळणार नव्हतं. टोकन दिलेल्या पाासबुकांचे गठ्ठे तयार होते. लेजरमधून आले की तुटून पडायचं. काय काय बघायचं ? काहीच नाही ! तारीख (ती बँकेतच भरलेली) पुढे मात्र सही, अक्षरी, आकडी ! 'पे कॅश' ला दणादण सह्या हाणायच्या. काहींनी मागे सह्या केलेल्या नसायच्या त्या पैसे देताना घ्यायच्या. पार्टीशनच्या पलिकडे नोटांची कुरकुर सुरू व्हायची. कोऱ्या नोटांचा वास यायचा. पॅकेट तोडल्याचे आवाज यायचे !

स्क्रोलमध्ये लिहायचं चोपडीत गठ्ठा कोंबला की पुढचं लेजर. कारखान्यातल्या असेंब्लीलाईनसारखं काम ! कधी दीड वाजायला आला कळलं नाही. आज चहा सुद्धा मागे जाऊन नाही. टेबलावरच. पेंशनरांची नजर चुकवत प्यायचा.

दोन वाजून गेले. स्क्रोलची तीन पानं पाठपोट झाली. जरा पेन ठेउन बोटं मोडली. तेवढ्यात कर्कश्य आरोळी.

''कामं करा. पंखे फिरतायत डोक्यावर. घशात चहा ओततायत. तरी अजून आमचा नंबर लागतच नाही. सकाळी आठ वाजता आलोय एक स्टेनगन हातात असती तर सगळ्यांना गोळ्या घातल्या असत्या.

म्हातारा होता. एवढं बोलून त्याला दम लागला. ''हवालदार होतो मिलिट्रित. ह्या हातानं गोळ्या घातल्यात समजलं ?''

बँकेत एकदम शांतता. पिनड्रॉप सायलेन.स.

तेवढ्यात नेमकी टाचण्यांची डबी पडली खाली. फटाक्यासारखा आवाज आला.

मला राहवलं नाही. मेसेंजरला सांगितलं, त्याचं पासबुक आधी आण बाबा. जाऊ दे त्याला.

तोच साहेबांचा (साहेब म्हणजे अर्थातच अकाउंटंसाहेब तेव्हा पी.बी.डी. नव्हती) हात खांद्यावर. मानेनंच त्यांनी मेसेंजरला थांबवलं. मला कळलं नाही असे का. पण विचारायचं नाही.

चार वाजेपर्यंत जरा कामाला आकार आला. माझ्यापुढचं बहुतेक सगळं संपलं होतं. पेमेंट स्क्रोल मधले सुरूवातीचे सुबक आकडे आणि अक्षरं तिरकी तिरकी होत गेली होती. मधे-मधे खातेनंबर लिहायचाही कंटाळा केला होता.

ह्या सगळ्या बेरजा. मग सगळ्या स्क्रोलांची बेरीज आणि मग रोकड विभागाकडून 'फिगर' यायची वाट बघायची !

जरा पाय मोकळे करायला हरकत नव्हती. साहेब उठले. मी पण पाठोपाठ उठलो. ब्रँचबाहेर जरा मोकळी हवा मिळाली.

एवढ्यात तो पेन्शनर दिसला. त्याच्या एका हातात नोटा घट्ट धरलेल्या होत्या. दुसऱ्या हातात पासबुक. चेहरा खूप केविलवाणा दिसत होता. गेल्या आठ-दहा तासात काही पोटात गेलं नसणार. थकेल नाही तर काय.

एक चहावाला पोरगा हातात किटली आणि एका बोटात चार कप अडकवून फिरत होता.

'ए, तो म्हातारा दिसतोय ना, तो पैसे धरलेला. त्याला चहा दे.' साहेबांचं फर्मान मी बघत होतो. पोरानं चहा दिला. साहेबांनी पैसे दिले. पेन्शनरनं गर्रकन वळून सॅल्यूट मारला. लष्करात मारतात ना तसा. पण बुटांच्या ऐवजी फाटक्या चपला असल्यामुळे वाजल्या नाही. त्याची एक चप्पल शिवलेली आणि एक बिनअंगठ्याची होती.

''आता तुला सांगतो'' साहेब अरे तुरे करायचे. वयाचा अधिकार!

'अरे, ह्याचं पासबुक आधी सोडलं असतंस तर काय झालं असतं? हा म्हणतोय मी आठला आलोय. काहीजण उजाडल्यापासून येऊन बसलेले असतात.

''मग ते लोक भडकले असते. इथे बँकेच्या इमेजचा प्रश्न आहे. मारामारी झाली असती आणि पोलिस बोलवायला लागले असते म्हणजे! फार वाईट दिसलं असतं''.

नो रिप्लाय फ्रॉम मी !

परत बँकेकडे वळणार तितक्यात त्या पेन्शनरासमोर तीन धिप्पाड तरूण उभे राहिले. तिघांच्या तोंडात पानाचा तोबरा. एकानं म्हाताऱ्यासमोर हात पसरला. त्यानं लगेच सगळ्या नोटा त्याच्या हातात ठेवल्या. अठराशे रूपये होते. माझ्या लक्षात राहिली होती त्याची विड्रॉवल स्लीप !

तिघांनी सहा सहाशे वाटून घेतले आणि वळून लगेच जायला लागले. म्हाताऱ्याच्या अंगावर पाच रुपयांची नोट मात्र फेकली.

'साहेब हा आमच्याच गावचा. दोन पोरं त्याचीच आणि तिसरा पुतण्या. गुंड आहेत तिघंही. म्हाताऱ्याला सांभाळलंय तरी का तर पेन्शनसाठी.'

अरेरे, काय ही अवस्था. हीच पोरं तान्ही असताना मांडीवर घेऊन बसत असेल. घास भरवत असेल आणि ती मुलं आता अशी

? कशा मुळे ?

त्याचं हळूहळू ओढत चालणं बघून मनात आलं, हा गावाकडे कधी पोहोचणार.

'हा घरी कधी पोहोचणार रे ?'

आता बघा वाजले पाच स्टँडवर जायला तीन किलोमीटर चालायला लागतं. ह्याला साडेपाचची गाडी काही मिळणार नाही. शेवटची गाडी साडेसातला. उरली सुरली सगळी माणसं कोंबून ती गाडी मुक्कामाला जाते.'

'मग हा त्या गर्दीत कसा चढणार ? मला त्याची काळजी वाटायला लागली होती.

'अहो, सगळे गावातले लोक. एकमेकाला ओळखतात. घेतात ओढून.'

पोटात अन्न कधी जाणार ? बारा तासाचा उपाशी आणि तहानलेला आणि अठराशे रूपये मिळूनही आज कोरडी भाकरीच असेल का?

असं का असावं ? प्राण देण्या घेण्यासाठी हा लष्करात दाखल झाला. त्याची जबाबदारी समोरून आलेल्या शत्रूला जखमी करणं, ठार मारणं, पकडणं. तर त्याला प्रमोशन, स्टार्स मिळणार.

आम्ही लेखणी बहाद्दर इथे काय करतो ?

रोज आठ-दहा तास बँकेला द्यायचे. संध्याकाळपर्यंत रोकडे जमवायची. कॅशबुक जमवायचं की संपलं. फक्त एवढं जरी नीटपणे केलं तरी पहिलं प्रमोशन निश्चित आणि दर पाच वर्षांनी पगारवाढ आहेच. माझ्यावर प्राण देण्याघेण्याची वेळ कधी येणार नाही. मात्र आणखी दहा वर्षांनी स्वतःचं घर, वाहन, प्रतिष्ठा नक्की मिळणार !

असा फरक का ? कुणामुळे ? समाजामुळे ? समाज म्हणजे काय ? आम्हीच सगळे ना ? की हे सिस्टीम फेल्युअर आहे ? की क्लास स्ट्रगल ? आणि पुढची पिढी अशी का वागते ? हे संस्कार कुठून आले ? की हे असंच चालत आलंय ? शंभर प्रश्न ! पण उत्तर ? कोण देईल ?

**- चिंतामणी मा.गोखले,** सांगली
भ्रमणध्वनी - ०९८२२२२०८३६

## धारदार सुरीशी खेळलो म्हणून

"यापूर्वी कधी अशा मॉलमध्ये काम केलं होतं ?" मॉलचे मॅनेजर त्याची मुलाखत घेत होते.

"हो ऽ ऽ चांगले वर्षभर कामाला होतो मी रिलायन्समध्ये."

"मग इतक्या चांगल्या कंपनीमॉलमधली नोकरी सोडली ? का ?"

"छे ! नोकरी मी सोडली नाही. त्यांनीच मला काढलं."

"ओऽ हो ऽ ! कां हो ?"

"एकदा मी एका नव्या धारदार सुरीशी खेळत होतो. मॅनेजरने पकडलं."

"छे ! ते काही तुम्हाला काढून टाकण्याचे कारण वाटत नाही. नक्कीच आणखी काही खास कारण असणार."

"नाही सर ! तेच खरं कारण आहे. कारण माझ्या पाठोपाठ त्यांनी तिलापण डच्चू दिला ना !!"

**- मधु रानडे,** नाशिक

## भरभर किती हे क्लास वाढले

*(चाल : रिमझिम पाऊस पडे सारखा)*

भरभर किती हे क्लास वाढले
बहरून आल्या अकादमी
गर्दी तेथील पाहुन वाटे
शाळा कॉलेज जणू डमी ।।धृ।।

नाही सीमा जनसंख्येला
विद्यार्थीगण नसे कमी
दिग्दर्शन परि तया न मिळते
क्लासेस देती पूर्ण हमी ।।१।।

पाल्यांच्या भवितव्यासाठी
क्लासेस आणि अकादमी
पालक मरती खर्चापायी
पाल्यांसी ना काही कमी ।।२।।

गुरू परी हे धनलोभी
पैसा मागती हरकामी
शिष्यगणांची परवड होई
गुरू होती कोटींचे स्वामी ।।३।।

**- पी.के.देवधर,** पुणे, दूरध्वनी - २४२२३८१४


मध्यम वर्गीयांसाठी डिलक्स, इकॉनॉमी सहली

# राजगुरू टुर्स

जिव्हाळा जपणारी माणसं

| | | |
|---|---|---|
| केरळ-बॅकवॉटर्स | (AC Bus) | 10,975/- |
| केरळ-कन्याकुमारी | (AC Bus) | 13,975/- |
| राजस्थान-मेवाड | | 12,275/- |
| बंगलोर-म्हैसूर-ऊटी<br>बेलूर-हलेबीड-श्रवणबेळगोळ | | 10,475/- |
| सोमनाथ-द्वारका-गिरनार | | 6,975/- |
| मध्यप्रदेश स्पेशल<br>खजुराहो - पंचमढीसह | | 16,475/- |
| हैद्राबाद-रामोजी-स्नोवर्ल्ड | | 7,775/- |
| अंदमान | | 27,975/- |

स्टेट बँक स्टाफ व पेन्शनर्सना रू.५००/-प्रत्येकी सवलत

संपर्क : राजन पाडलोसकर - 9322231216
मुंबई : 022 - 2431 8082 / 2438 1026
पुणे : 9822949289

# सहज सुचलं म्हणून

'डॅबीस' हा शब्द इंग्रजी आहे की मराठी ? मुळात हा स्वतंत्र असा शब्द तरी आहे का ? मराठी तसेच इंग्रजी डिक्शनरीज चाळल्यवर मला पडलेला प्रश्न.

एका हुषार मुलाने सांगितलं की, ''काका 'डॅम धीस' चा हा शॉर्ट फॉर्म असेल. कशाला एवढं डोकं खाताय.''

उत्तर पटण्यासारखं होतं. पण उत्सुकता स्वस्थ बसू देईना. म्हणून शब्दांच्या प्रवासाचा शोध असाच चालू ठेवला विरंगुळा म्हणून.

वानगीदाखल काही शिंपले हाती लागले तसे. आपला 'गणेश' ग्रीक पुराणात 'जॅनस' झाला. तोही बुद्धीदेवता असून गजमुखी आहे. मंगलकार्यारंभी त्याचीही पूजा केली जाते. (संदर्भ - 'श्रीगणेश पुराण' - संपा. अमरेंद्र गाडगीळ).

हिप्नॉटाईजचा पूर्वज संस्कृत 'स्वप्न' आहे. हे समजल्यावर आपणच हिप्नॉटाईज होतो. संस्कृत 'स्वप्न'चे ग्रीक रुपांतर 'हुप्नास' झाले. त्याचा पुढे हिप्नासीस झाला.

संस्कृत 'पिता' पातेर आणि 'माता' मेतेर.

ज्या शब्दांच्या प्रवासाबद्दल आपण बोलतोय तो शब्द देखील ग्रीकांचा झाल्यावर 'अब्द' झाला. मर्ढेकरांनी त्याच स्वरूपात त्यांच्या एका कवितेत त्याचा वापर केला आहे. अर्थात मर्ढेकरांना त्याचा अन्य काही अर्थ अभिप्रेत असेल तर मला माहित नाही.

ग्रीकांच्या प्रमुख देवतांपैकी 'इयुस' हा संस्कृत 'द्यूस' म्हणजे प्रकाशचे ग्रीक रुपांतर आहे. ह्या शोधाला अंत नाही म्हणून तूर्त इतकेच.

खरेतर ह्या शब्दांच्या वाटेला जाण्याचा मूळ इरादा नव्हताच. एका मासिकात एक श्लोक वाचनात आला.

''ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे,  
त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे.  
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी,  
तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही.''

त्याच मासिकात अन्य एका पानावर एक उर्दू शेर होता.

''रींद (सामान्य माणूस) जो श्वीश्त (विट) उठाले  
वही कुजा (चषक-प्याला) बन जाये.  
जीस जगह बैठके पी ले  
मैखाना बन जाये''

एक शायर एक संतकवि. दोघांचे विषय वेगवेगळे. प्रज्ञा मात्र एकच आणि आर्तताही. त्यामुळे प्रतीकं, शब्द बदलली तरी तल्लीनताही सारखीच.

गाढे विचारवंत अश्या तऱ्हेने एकाच प्रकारे व्यक्त होऊ शकतात. भिन्न विषय, भिन्न भाषा आणि भिन्न देशात एकमेकांपासून हजारो मैल दूर असतानाही.

मनात विचार आला. शब्दांचेही असेच असेल का ? पण लगेच हेही लक्षात आलं की नाही शब्दांचा प्रवास ही पूर्णपणे वेगळी गोष्ट आहे. अविष्कारासाठी माध्यम म्हणून त्यांचा उपयोग अपरिहार्य असला तरी शब्दांच्या प्रवासाचा निश्चित असा मार्ग आहे. माणूस हा त्याचा माध्यम आहे.

कल्पनाविष्कार ही एकदमच वेगळी गोष्ट आहे. प्रकटीकरणासाठी ज्ञान, भाषा देश इत्यादी कोणत्याही माध्यमाशिवाय केव्हाही, कोठेही ह्या 'सद्‌गुरूचे' पाय मन जाईल तिथे हजर असतात.

**- नी.ब.ओढेकर,** नासिक

*************************

# प्रतिक्रिया

ऑगस्ट २००९ च्या 'संवाद' अंकामध्ये 'श्री.भास्करराय नमः' या शिर्षकाखाली श्री.श्रीधर सहस्रबुद्धे यांनी आपल्या लेखाद्वारे श्री.गद्रे साहेबांना वाहिलेली श्रद्धांजली मनाला भावून गेली. अशा प्रकारचा माहितीपूर्ण व वाचनीय लेख श्री.गद्रे साहेबांच्या दीर्घ संपर्कात आलेली व्यक्तीच लिहू शकेल. परंतु श्री.सहस्रबुद्धे यांना अशी संधी प्राप्त होण्याची शक्यता कमीच. तरीपण लेखाकरिता आवश्यक असलेली माहिती गोळा करण्यात व ती योग्य शब्दात आकर्षकपणे मांडण्यात त्यांनी केलेले प्रयास कौतुकास्पद आहेत. श्री.गद्रे साहेबांचा समृद्ध जीवन प्रवासाचा आलेखच त्यांनी समर्थपणे चित्रित करून, जे वाचक गद्रे साहेबांना फारसे ओळखत नसतील, त्यांना देखील आपल्या जवळच्या सहकार्याचे मूर्तिमंत चित्रच उभे केले असे वाटावे. बुद्धि आणि कर्तृत्व याच्या सन्मानाचे प्रतिक म्हणून लोकमान्य टिळकांच्या पगडीकडे बघितले जाते. श्री.गद्रे साहेबांचे पगडी घातलेले चित्र या लेखाच्या प्रारंभी छापून त्यांच्या बुद्धीमत्तेचे व बहुआयामी कर्तृत्वाचे दर्शन वाचकांना करून देण्याचे औचित्य त्यांनी साधले असे म्हणता येईल, इतके चपखल बसले आहे. असा सर्वांग परिपूर्ण 'श्रद्धांजली लेख' लिहिल्याबद्दल श्री.सहस्रबुद्धे यांना धन्यवाद.

**- एन.जी.मोरे**, नागपूर

************

आजच 'संवाद' चा अंक मिळाला. त्यात श्री.मुकुंद सराफ यांचा 'येई वर्षादेवी' हा ललित लेख वाचला. चांगला आहे. पण त्यात त्यांनी 'नको नको रे पावसा, असा धिंगाणा अवेळी, घर माझे चंद्रमौळी, आणि दारात सायली' या ओळी पद्मा लोकुरांच्या कवितेतील ओळ असा उल्लेख केला आहे. सदर ओळ ही इंदिरा संत यांच्या कवितेतील आहे. एका सुंदर कवितेचे श्रेय दुसऱ्याच कवयित्रीला नको म्हणून हा पत्रप्रपंच.

**- सुरेश रघुनाथ गांगुर्डे,**  
देवपूर (धुळे)

## विचित्र तरी मनोहर

लग्न होवून मी सासरी आले. तेव्हा एका गोष्टीची मी मनात पक्की खूणगाठ बांधली. काही झाले तरी नवरा हा त्याच्या गुणदोषांसह स्विकारायचा व कधीही संघर्षाचा प्रसंग येऊ द्यायचा नाही. माझ्या पतीची बँकेत ३८ वर्षे नोकरी झाली. आमच्या ह्यांचा स्वभाव जरा जास्तच जिद्दी. काम घरचे असो किंवा बँकेचे त्यांनी मनावर घेतले की कितीही कष्ट पडोत, वेळ लागो ते पूर्ण करूनच दाखवतात. हा अतिरेकीपणा पुष्कळदा माझ्या त्रासाला/मन:स्तापास कारणीभूत झाला आहे. हा असाच एक प्रसंग !

तेव्हा आम्ही मिरजेत होतो. माझ्या मुली सुट्टीत माहेरी म्हणजे त्यांच्या आजोळी गेल्या होत्या. त्यामुळे घरी आम्ही दोघेच होतो. त्यावेळी देवल टॉकिजला एक चांगला सिनेमा चालू होता. मी ह्यांच्याजवळ सिनेमाला जाण्याचा विषय २/३ वेळा काढला. पण ह्यांची नेहमीचीच टोलवा टोलवी. कंटाळून मी नाद सोडला. ह्यांना काय वाटले - कुणास ठाऊक ? एक दिवस तेच म्हणाले, 'हे बघ आज आपण त्या पिक्चरला जावू. तू बँकेत ये (तिथून थिएटर जवळ होते) मी काम आवरून ठेवतो म्हणजे परस्पर जाता येईल.' इतके झाल्यावर मला ते साहजिकच खरे वाटले. मी ठरल्याप्रमाणे थोडा वेळ आधीच बँकेत गेले. तर हे कामात गढलेले ! बँकेचा शिपाई नेहमी घरी येणारा, त्याने मला ओळखले व आपल्या साहेबांना मी आल्याचे सांगितले. हे लागलीच जवळ आले व म्हणाले, 'हे बघ, मी १० मिनिटात काम संपवून थिएटरवर येतो ही तिकीटे घे. तोपर्यंत तू थिएटरमध्ये जाऊन बस. मला सर्वजण ओळखतात. त्यामुळे तिकीटे तुझ्याकडे राहिली तरी चालतील.' सोबत शिपाई दिल्यामुळे मी थिएटरवर जाऊन जागेवर बसले.

पिक्चर सुरू होऊन अर्धा तास होत आला तरी यांचा पत्ताच नाही. मी २/३ वेळा बाहेर बघून आले. माझी अस्वस्थता पाहून शेजारी बसलेल्या बाईंनी 'काही हरवलंय काय ?' म्हणून चौकशी केली. मध्यंतर झाला तरी यांचा पत्ताच नव्हता. मनातल्या मनात चरफडत मी खुर्चीवर बसून होते. पण चित्रपटाकडे लक्ष लागत नव्हते. अखेर पिक्चर संपला. सर्वजण हळूहळू बाहेर पडले. मला दुसरा पर्यायच नव्हता. रडवेल्या चेहऱ्याने मी गेटजवळ आले तर आमची ही स्वारी बॅग सावरीत सावरीत जवळ येत होती. चार माणसात शोभा नको म्हणून मी गप्प राहणार होते. पण मनातला राग शेवटी बाहेर आलाच. मी म्हणाले, 'हे हो काय ! मी बघतेय **तुमचे हे भलतेच आहे.** मी इकडे वाट पहातेय याचे काहीच नाही का ?' आमचे हे साखर पेरणीत भलतेच वस्ताद. हसत हसत काय म्हणाले सांगू ? 'अगं कामाच्या गर्दीत थोडासा (?) वेळ झाला. काय करू सांग बरं पिक्चर कसा होता ?' (आता मी काय सांगू कपाळ !) थोड्या वेळाने तेच म्हणाले, 'तू राग मानू नकोस. आता आपण हॉटेलात बाहेरच जेवण घेऊ म्हणजे तुझा राग कमी होईल.' नंतर सर्व गोष्टी नेहमीप्रमाणेच पार पडल्या. ह्यांचा विचित्र तरी मनोहर' असा हा अनुभव मी अनेकदा घेतला आहे.

निवृत्तीनंतर मात्र यांच्यात पूर्ण फरक पडला आहे. बँकेत वेळेचे भान विसरून काम करणारी पिढी आता तिथे नाही. नवनवीन संगणकीय सुविधांमुळे त्याची तितकी जरूरी राहिलेली नाही. आता यांना तिकडची आठवण महिन्यातून एकदाच पेन्शनचे वेळी होते. तीही आम्ही जवळच्या ATM मधून काढतो. आणि खरं सांगू हरवलेलं वासरू दाण्याजवळ आल्यावर जसा आनंद होतो ना, तसाच आनंद यांच्या निवृत्तीनंतर मला झाला.

**- सौ.विद्या वि.कुलकर्णी,**
कोल्हापूर

## आमच्या वेळी

आमच्या वेळी होत अस्सल बँकिंग
आता मात्र आलं आहे निव्वळ बँकिंग ।।१।।
त्यावेळीही होतं A for आम्ही
T for तुम्हास M for मदतीस आहोत तत्पर ।
आता आहे अहो A for तुम्हास T for मशीन ।
बाहेर जा लवकर ।।२।।
संगणक आल्यापासून बरंच काम झालं आहे सुकर ।
पण त्याचवेळी माणसांच्या मनातलं मात्र
वाढलं आहे अंतर ।।३।।
तेव्हा फॉर्म भरून पैसे भरताच परत येताना मिळे पासबुक।
आता मात्र फॉर्म ते पासबुक यासाठी वेळ लागतो खूप।।४।।
पूर्वी खाते उतारा मिळण्यास बराच लागे वेळ ।
आता संगणकामुळे तो आहे २/३ मिनिटांचा खेळ ।।५।।
आमच्या वेळी बॅलन्सींग बेरजा-वजाबाक्या यांची असे कटकट
आता संगणकाच्या वापराने हे सर्व होत आहे झटपट ।।६।।
बँकेच्या कामात सर्वांना खूप सोसावे लागले टेन्शन
पण निवृत्तीनंतर मात्र त्यांना मिळते अपुरे पेन्शन ।।७।।
कोणी वंदा अथवा निंदा बँकेचा वाढतो आहे धंदा
कारण बँकेने विश्वासाचा जपला आहे रूपया बंदा ।।८।।
विश्वास, सेवा व सहकार्य हे आहे आपल्या बँकेचे त्रिसूत्र
लई नाही पण हे असंच जपावं हेच देवाशी मागणं मात्र ।।९।।

**- गोपाळ मुळे,**
सावेडी,(अ.नगर)
भ्रमणध्वनी - ९८९०८६३८६९


भारतीय स्टेट बैंक
हर मोड़ पर आपके साथ
सिर्फ़ बैंकिंग.
और कुछ नहीं.
मनाइए दीपावली
स्टेट बैंक के शुद्ध सोने के सिक्कों के साथ
स्टेट बैंक भारत की सबसे विश्वसनीय बैंक,
प्रस्तुत करती है 999.9 शुद्ध सोना.
• एसे प्रमाणित और टैम्पर प्रूफ पैकेजिंग.
• सोने की दैनिक दरों पर आधारित मूल्य.
• निवेश, व्यक्तिगत व कॉरपोरेट उपहार के लिए उपयुक्त.
• 2 ग्राम, 4 ग्राम, 5 ग्राम, 8 ग्राम तथा 10 ग्राम के सोने के सिक्के.
(चुनी हुई शाखाओं पर 20 ग्राम तथा 50 ग्राम भी)
5 g
PURE GOLD
999.9
शुद्धता का विश्वास
भारत भर में 1100 से भी अधिक शाखाओं में उपलब्ध. अधिक विवरण के लिए : नजदीकी एसबीआई शाखा पर पधारें/24X7 हेल्पलाइन 1800 11 22 11 (बीएसएनएल/एमटीएनएल लैंडलाइन से निशुल्क) या 080-26599990 (अन्य लाइन्स) पर सम्पर्क करें. ई-मेल: contactcentre@sbi.co.in
हर भारतीय का बैंक

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
License to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

# Chairman's visit to Amalner Branch on 15-08-2009



Shri. Chandratre, President of Amalner Unit of SBI Pensioners' Association giving Silver Memento to Shri. O. P. Bhatt, Chairman, State Bank of India



A group of Pensioners from Amalner Unit of SBI Pensioners' Association along with Shri. O. P. Bhatt, Chairman, State Bank of India

सूचना : १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.

२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

To,

**If Undelivered Please Return to :**
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor, Block No.16, Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune - 411030. Phone : 24332141**

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.